**यवतमाळ जिल्हयात किटकनाशकाची फवारणी करतांना शेतकरी/शेतमजुर यांना झालेली विषबाधा व काहींचा मृत्यु या प्रकरणी विशेष तपासणी पथकाचा अहवाल.**

**•• अनुक्रमणिका ••**


| अ. क्र. | विषय | पान क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत |
| 1 | यवतमाळ जिल्हयात किटकनाशकाची फवारणी करतांना शेतकरी/शेतमजुर यांना झालेली विषबाधा व काहींचा मृत्यु या प्रकरणी विशेष तपास पथकाची स्थापना व कार्यकक्षा | 1 | 2 |
| 2 | विशेष तपास पथकाच्या सभा, भेटी व केलेल्या कामकाजाचा तपशिल. | 3 | 5 |
| 3 | शेतातील पिकांवर किटकनाशकांची फवारणी करतांना यवतमाळ येथील शेतकरी/शेतमजुर यांना झालेली विषबाधा व काहींचा मृत्यु या प्रकरणी विशेष तपासणी पथकाने केलेल्या तपासणीचा अहवाल. | - | - |
| | 1) सदर मानव निर्मित आपत्ती (Man Made Disaster) घडण्याकरीता कारणीभुत ठरलेल्या बाबी निश्चित करून त्याबाबत प्रतिबंधात्म्क शिफारशी देणे. | 6 | 19 |
| | 2) सदर मानव निर्मित आपत्तीवर प्रतिबंध घालण्याकरीता कायदयात तरतुदीची अंमलबजावणी करतांना घडलेल्या चुका त्याकरीता जबाबदार व्यक्ती, संस्था व शासकीय / निमशासकीय अधिकारी / कर्मचारी निश्चित करणे. | 20 | 21 |
| | 3) जिल्हयात बिगर परवाना किटकनाशकांची विक्रीचे प्रकरणी करण्यात आलेली कार्यवाही तसेच किटकनाशकांचे नमुने अप्रमाणित आढळून आलेल्या प्रकरणांवर करण्यात आलेली कार्यवाहीचे गुणात्मक विश्लेषण करून शिफारशी देणे. | 22 | 22 |
| | 4) सद्या विक्री परवाना असलेले काही किटकनाशके, स्प्रे पंप इत्यांदींची विक्रीवर प्रतिबंध घालणे आवश्यक असल्यास त्याबाबत शिफारशी करणे. | 23 | 24 |
| | 5) यवतमाळ जिल्हयातील याप्रकारच्या प्रमुख/महत्वाच्या घटनांबाबत अहवाल देण्याच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांना अहवाल सादर न करण्या संदर्भात झालेल्या उणिवा शोधुन काढणे. त्यास जबाबदार असणा-या विभागाची माहिती निश्चित करणे. | 25 | 25 |
| | 6) या दुर्घटनेवर जिल्हा नियंत्रण कक्ष (District Disaster Control Room) व्दारे करण्यात आलेले सनियंत्रण, देखरेख व घटना नंतर करण्यात आलेले मदत कार्यबाबत निष्कर्ष. | 26 | 35 |
| | 7) याप्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती भविष्यात होऊ नये याकरीता तातडीने करावयाची कार्यवाहीबाबत शिफारस करणे. | 36 | 37 |
| **4** | जोडपत्र | 38 | 55 |
| **5** | शासन निर्णय - | 56 | 71 |

**यवतमाळ जिल्हयात किटकनाशकाची फवारणी करतांना शेतकरी/शेतमजुर यांना झालेली विषबाधा व काहींचा मृत्यु या प्रकरणी विशेष तपासणी पथकाचा अहवाल.**

1) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, शासन निर्णय क्रमांक : सीपीएस-1117/प्र.क्र.193/17-अे मादाम कामा मार्ग, मुंबई, दिनांक :- 13 ऑक्टोबर, 2017
2) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, शासन निर्णय पुरकपत्र क्रमांक : सीपीएस-1117/प्र.क्र.193/17-अे(1) मादाम कामा मार्ग, मुंबई, दिनांक :- 14 नोव्हेंबर, 2017

प्रस्तावना :

यवतमाळ जिल्हयात खरीप 2017 या हंगामात शेती पिकांवर किटकनाशकांची फवार णी करतांना मोठया संख्येने शेतमजूर/शेतकरी यांना विषबाधा होणे व त्यापैकी काहींचा मृत्यु होणे अशा घटना घडलेल्या आहेत . राज्य मंत्रीमंडळाने दिनांक 10 ऑक्टोबर, 2017 रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत किटकनाशकांच्या प्रादुर्भाव झाल्याने शेतमजूर/शेतकरी मृत्युमुखी झालेल्या घटनेची तपासणी करण्यासाठी “विशेष तपास पथक” स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने वरिलप्रमाणे क्र.1 नुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. शासन निर्णय क्रमांक 2 नुसार सदर समितीने अहवाल दिनांक 27 नोव्हेंबर 2017 पर्यत शासनास सादर करण्याचा कालावधी देण्यात आला.

विशेष तपास पथक

| अ.क्र. | नाव | पदनाम | पद |
|---|---|---|---|
| 1 | **श्री पीयूष सिंह (भा. प्र. से.)** | विभागीय (महसूल) आयुक्त, अमरावती | विशेष तपास पथक प्रमुख |
| 2 | **श्री छगन हिलाल वाकडे (भा.पो.से.)** | विशेष पोलीस महानिरिक्षक परिक्षेत्र अमरावती | सदस्य |
| 3 | **डॉ नितिन नथ्थुजी अंबाडेकर** | उप संचालक आरोग्य सेवा, अकोला | सदस्य |
| 4 | **डॉ धनराज बापु उंदिरवाडे** | विभाग प्रमुख, किटकशास्त्र विभाग, डॉ पं. दे. कृ. वि. अकोला | सदस्य |
| 5 | **डॉ विजय नामदेव वाघमारे** | संचालक, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर | सदस्य |
| 6 | **श्री किरण वासुदेव देशकर** | उप निदेशक वनस्पती सरंक्षण, संगरोध आणि संग्रह संचालनालय फरीदाबाद | सदस्य |
| 7 | **श्री सुभाष कारभारी नागरे** | विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती | सदस्य सचिव |

टीप: डॉ.विजय जयवंतराव ठाकरे, उपसंचालक प्रादेशिक न्यायसहाय्यक वैद्यानिक प्रयोगशाळा अमरावती यांची तज्ञ म्हणून मदत घेण्यात आली

# कार्यकक्षा

1) सदर मानव निर्मित आपत्ती (Man Made Disaster) घडण्याकरीता कारणीभुत ठरलेल्या बाबी निश्चित करून त्याबाबत प्रतिबंधात्मक शिफारशी देणे.

2) सदर मानव निर्मित आपत्तीवर प्रतिबंध घालण्याकरीता कायदयात तरतुदीची अंमलबजावणी करतांना घडलेल्या चुका त्याकरीता जबाबदार व्यक्ती, संस्था व शासकीय / निमशासकीय अधिकारी / कर्मचारी निश्चित करणे.

3) जिल्हयात बिगर परवाना किटकनाशकांची विक्रीचे प्रकरणी करण्यात आलेली कार्यवाही तसेच किटकनाशकांचे नमुने अप्रमाणित आढळून आलेल्या प्रकरणांवर करण्यात आलेली कार्यवाहीचे गुणात्मक विश्लेषण करून शिफारशी देणे.

4) सद्या विक्री परवाना असलेले काही किटकनाशके, स्प्रे पंप इत्यांदींची विक्रीवर प्रतिबंध घालणे आवश्यक असल्यास त्याबाबत शिफारशी करणे.

5) यवतमाळ जिल्हयातील याप्रकारच्या प्रमुख/महत्वाच्या घटनांबाबत अहवाल देण्याच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांना अहवाल सादर न करण्या संदर्भात झालेल्या उणिवा शोधुन काढणे. त्यास जबाबदार असणा-या विभागाची माहिती निश्चित करणे.

6) या दुर्घटनेवर जिल्हा नियंत्रण कक्ष (District Disaster Control Room) व्दारे करण्यात आलेले सनियंत्रण, देखरेख व घटना नंतर करण्यात आलेले मदत कार्यबाबत निष्कर्ष.

7) याप्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती भविष्यात होऊ नये याकरीता तातडीने करावयाची कार्यवाहीबाबत शिफारस करणे.

**यवतमाळ जिल्हयात किटकनाशकांची फवारणी करतांना शेतकरी/शेतमजुर यांना झालेली विषबाधा व काहींचा मृत्यु या प्रकरणी मा. विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती विभाग तथा अध्यक्ष विशेष तपास पथक यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपासणी पथकाच्या झालेल्या सभा, भेटी व करण्यात आलेली कार्यवाही**

| अ. क्र. | दिनांक | ठिकाण | कार्य विवरण |
|---|---|---|---|
| 1 | 25.10.2017 | विभागीय आयुक्त (महसूल), कार्यालय, सभागृह अमरावती | मा. विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती विभाग यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची पहिली आढावा सभा आयोजीत करण्यात आली व सभेमध्ये शासन निर्णयात नमुद केलेल्या कार्यकक्षेप्रमाणे सविस्तर चर्चा व पुढील कार्यवाहीची रूपरेषा ठरविण्यात आली. |
| 2 | 30.10.2017 | जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ महसूल सभागृह | मा. विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती विभाग यांचे अध्यक्षतेखाली मा. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथील महसूल सभागृह येथे जिल्हास्तरीय प्रमुख (सर्व) यांची विशेष तपास पथकासह सभा व व कामकाज |
| | | वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ | कै. श्री वसंतराव नाईक वैद्यकीय शासकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे सर्व विशेष तपास पथकासह रूग्णांची भेट व तेथील कामकाजाचा आढावा घेतला. |
| | | दारव्हा | विशेष तपास पथक चमूसह शासकीय विश्रामगृह, दारव्हा येथे विषबाधीत रूग्णांची भेट व चर्चा व कामकाज. |
| | | मौजे सेवादासनगर | कै. श्री रवि दुलसिंग राठोड यांचे घरी विशेष तपास पथकाची भेट, सात्वंन व विचारपूस व ग्रामवासियांशी, मजुरांशी चर्चा |
| 3 | 01.11.2017 | विभागीय आयुक्त (महसूल), कार्यालय, सभागृह अमरावती | मा. विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती विभाग यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची सभा व कामकाज. |
| 4 | 03.11.2017 | जिल्हाधिकारी कार्यालय, लोकशाही सभागृह, अकोला | मा. विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती विभाग यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक, मा. जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय अधिकारी (सर्व) यांची आढावा सभा व कामकाज. अकोला जिल्हयातील किटकनाशक कंपनीचे प्रतिनिधी व कृषि सेवा केंद्राचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा व कामकाज. अकोला जिल्हयातील पीजीआर कंपनीचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा व कामकाज. |
| | | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला व जिल्हा रूग्णालय, अकोला येथे रूग्णांची भेट व तेथील कामकाजाचा आढावा घेतला. |

| अ. क्र. | दिनांक | ठिकाण | कार्य विवरण |
|---|---|---|---|
| | | मौजे आगर, ता. अकोला | मौजे आगर, ता. अकोला येथील कै. राजेश मनोहर फुकट यांचे घरी विशेष तपास पथकाची भेट, सात्वंन व विचारपूस व ग्रामवासियांशी, मजुरांशी चर्चा व कामकाज. |
| 5 | 06.11.2017 | विभागीय आयुक्त (महसूल), कार्यालय, सभागृह, अमरावती | मा. विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती विभाग यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची सभा व कामकाज. |
| 6 | 15.11.2017 | विभागीय आयुक्त (महसूल), कार्यालय, अमरावती सभागृह | मा. विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती विभाग यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची सभा व कामकाज. |
| 7 | 21.11.2017 | विभागीय आयुक्त (महसूल), कार्यालय, अमरावती सभागृह | मा. विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती विभाग यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची सभा व कामकाज. |
| 8 | 27.11.2017 | विभागीय आयुक्त (महसूल), कार्यालय, अमरावती सभागृह | मा. विभागीय आयुक्त (महसूल), अमरावती विभाग यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची अंतिम सभा, कामकाज व अहवाल अंतिम केला. |

अमरावती व नागपूर विभागातील सर्व वृत्तपत्रातुन जनहितार्थ प्रसिध्दी देण्याबाबत जाहीर आवाहन करण्यात आले. त्यामध्ये शेतकरी, सुजाण नागरीक, स्वयंमसेवी संस्था / प्रतिनिधी यांना या विषयाबाबत सूचना/सुधारणा सूचविणेबाबत उपसंचालक माहिती, अमरावती यांना प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निवेदन 31.10.2017 पर्यत प्राप्त झाले होते.

| अ.क्र. | नाव व पदनाम (सर्वश्री) | पत्ता |
|---|---|---|
| 1 | ब्रिज उबेरॉय, चिफ एक्सीकेटीव्ह ऑफिसर | क्रॉप लाईफ इंडिया, 226-228 अनसल चेंबर-2, 6 भिकाजी कामा प्लेस, न्यु दिल्ली |
| 2 | शेतकरी जागर मंच | जिल्हा - अकोला |
| 3 | मनोहर परचुरे, सुजाण नागरिक तथा भारत सरकारच्या सेंद्रिय शेती तज्ञ समितीचे मानद सदस्य | 285, रामनगर, जिल्हा - नागपूर |
| 4 | डॉ प्रिती जोशी | नॅशनल ऑर्गनायझेशन फॉर कम्युनिटी वेलफेअर, जिल्हा - वर्धा |

| अ.क्र. | नाव व पदनाम (सर्वश्री) | पत्ता |
|---|---|---|
| 5 | विवेक डांगे | सेंटर फॉर संस्टीनेबल ऑग्रीकल्चर, जिल्हा - वर्धा |
| 6 | महेंद्र फाटे | कमलनयन जमनालाल बजाज फाऊंडेशन, जिल्हा- वर्धा |
| 7 | बंदु विठ्ठलराव अंबटकर | साईबाबा ग्रामिण विकास संस्था, चांदुर रेल्वे, जि. जिल्हा - अमरावती |
| 8 | आम आदमी पार्टी | जिल्हा - अमरावती |
| 9 | राजु श्रॉफ | क्रॉप केअर फॉऊन्डेशन ऑफ इंडिया, युपीएल हाऊस, 610 बी/2, बान्द्रा व्हिलेज, बान्द्रा ईस्ट, मुंबई |

**<u>शेतातील पिकांवर किटकनाशकांची फवारणी करतांना यवतमाळ येथील शेतकरी/शेतमजुर यांना झालेली विषबाधा व काहींचा मृत्यु या प्रकरणी विशेष तपासणी पथकाने केलेल्या तपासणीचा अहवाल</u>**

यवतमाळ जिल्हयात खरीप 2017 या हंगामात शेती पिकावर किटकनाशकांची फवारणी करतांना मोठया संख्येने शेतकरी/शेतमजुर यांना विषबाधा होणे व त्यापैकी काहींचा मृत्यु होणे अशा घटना घडलेल्या आहेत. सन 2017 मध्ये माहे जानेवारी 2017 ते ऑक्टोबर 2017 या कालावधीत अमरावती विभागात उपलब्ध आकडेवारी नुसार किटकनाशक फवारणीमुळे विषबाधेच्या रूग्ण संख्येत जानेवारी 2016 ते ऑक्टोबर 2016 या कालावधीच्या तुलनेत वाढ झालेली दिसून येते. त्यानुषंगाने शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने अभ्यास केला आणि सदर विषबाधेच्या प्रमाणात झालेल्या वाढीबाबत तपासणी करून पुढीलप्रमाणे निरीक्षणे, अभिप्राय व शिफारशी सूचविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक - 1 सदर मानव निर्मित आपत्ती (Man Made Disaster) घडण्याकरीता कारणीभुत ठरलेल्या बाबी निश्चित करून त्याबाबत प्रतिबंधात्मक शिफारशी देणे.</u>**

- **<u>पिक परिस्थिती, हवामान व मानव निर्मित बाबी</u>** - यवतमाळ जिल्हयात कापूस पिकाची लागवड पारंपारीक पध्दतीने वर्षानुवर्षे होत असून कापूस लागवडीखालील क्षेत्र 4 लाख 70 हजार हेक्टर सोयाबीन पिकाचे 2.55 लाख हेक्टर व तुर पिकाचे 1.35 लाख हेक्टर इतके आहे. यवतमाळ जिल्हयामध्ये कापूस पिकाचे हे राज्याच्या एकुण कापूस पिकाच्या क्षेत्राच्या अंदाजे 10% एवढे आहे. यवतमाळ जिल्हयात कापूस हे एकेरी पिक पध्दतीने मोठया क्षेत्रावर घेतले जाते तसेच 99% पेक्षा जास्त क्षेत्रावर जनुकीय तंत्रज्ञान (बीटी) कापूस वाणाची लागवड होते. भारतीय हवामानशास्त्र विभागाकडून मिळालेल्या माहिती नुसार यवतमाळ जिल्यात सन 2016 च्या तुलनेत सन 2017 मध्ये माहे जुन ते ऑक्टोबर या कालावधीत सरासरी कमाल व किमान तापमानात 1.1 डिग्री से. ने वाढ असून सकाळच्या आद्रतेमध्ये 2.8% ने वाढ व सायंकाळच्या आद्रतेमध्ये 12.1% ने वाढ झालेली आहे. तसेच सरासरी पर्जन्यमान 77 मि. मि. ने घट झालेली आहे. सन 2017 मध्ये पाऊसाला लवकर सुरूवात झाली परंतु जुन महिण्यात 17 दिवस, जुलै महिण्यात 16 दिवस, ऑगस्ट महिण्यात 17 दिवस व सप्टेंबर महिण्यात 17 दिवसाचा पाऊसाचा खंड आढळुन आला. सन 2017 च्या खरीप हंगामात कापूस या पिकाची वाढ गतवर्षी पेक्षा 1 ते 1.5 फुटाने जास्त (पाच ते सहा फुट) आढळुन आली. हिच परिस्थिति विभागातील इतर जिल्हयात कमी अधिक प्रमाणात आढळुन आली. जास्त तापमान व आद्रतेत वाढ, कापूस पिकाच्या झाडोराचा पसारा दाटल्यामुळे दोन कापूस पिकाच्या ओळीमध्ये हवा खेळती राहली नाही. बीटी कापूस वाण रस शोषण करणा-या किडी प्रामुख्याने पांढरी माशी, तुडतुडे, फुलकिडे यांसह बोंडअळी व गुलाबी बोंड अळीला गतवर्षापेक्षा बळी पडल्याचे आढळुन आल्यामुळे किटकनाशकांची फवारणी करणे गरजेचे झाले. प्रतिकुल हवामानामुळे व वातावरण बदलामुळे किटकनाशक फवारणीच्या संख्येत वाढ झाली.

- कापूस पिकाची उंची जास्त असल्यामुळे फवारणी करतांना स्प्रे पंपाची फवारणी नळी ही खांदयापेक्षा उंचीवर पकडून कापूस पिकावर फवारणी करावी लागली. त्यामुळे फवारणीचे अंश शेतकरी/शेतमजुर यांच्या तोंडाच्या/चेह-याच्या समांतर पातळीवर असल्याने श्वासोच्छवासाव्दारे (Inhalation) किटकनाशके शरीरात जाण्याचे प्रमाण वाढले. तसेच एक रांग फवारणी करून दुस-या रांगेत फवारणी करतांना हवेचे विरूध्द दिशेने फवारणी केल्यामुळे किटकनाशकाचे अंश शेतकरी/शेतमजुर यांचे शरीरावर, श्वासोच्छवासाव्दारे तसेच त्वचेव्दारे शरीरात गेल्यामुळे विषबाधा होण्याचे प्रमाण वाढले. किटकनाशकाची फवारणी साधारणत: वा-याचा वेग व ऊन कमी असतांना शक्यतो सकाळी किंवा दुपारनंतर करणे आवश्यक आहे. तसे न करता फवारणी सकाळी 9 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत 3 ते 4 दिवस सातत्याने/सलग केल्याचे निदर्शनास आले. तसेच काही ठिकाणी सायंकाळी 8 वाजेपर्यंत फवारणी केल्याचे निदर्शनास आले आहे.

दरवर्षी आढळुन येणारी ऑक्टोबर महिण्यात असणारे जास्त उष्णतामाण (ऑक्टोबर हीट) ही यावर्षी माहे सप्टेंबर महिण्यात दिसून आली. या कालावधीत कमाल तापमाना मध्ये नेहमी पेक्षा 2 डिग्री से. तसेच आद्रता 10% पेक्षा अधिक असल्यामुळे जास्त घाम येऊन किटकनाशकाचे त्वचेमार्फत शरीरामध्ये शोषण जास्त प्रमाणात होऊन विषबाधेची शक्यता वाढली. त्याचप्रमाणे वाढलेल्या तापमानामुळे किटकनाशकांची वाफेत (Poisonous Fumes) रूपांतर होण्याचे प्रमाण वाढले.

- शेतामधील पिकांवर किटकनाशकाची फवारणी करतांना शेतकरी/शेतमजुर यांनी केवळ तोंडाला रूमाल बांधुन तोकडया/उघडया अंगाने कपडयामध्ये संरक्षण कपडयाविना, संरक्षण मुखवटा (मास्क), गॉगल (चष्मा), हातमोजे, टोपी, बुट, एॅप्रॉन इत्यादी साहित्य न वापरल्यामुळे विषबाधेची शक्यता वाढल्याचे निदर्शनास आले आहे.
- शेतामधील पिकांवर वेगवेगळया किडी व रोगा नूसार वेगवेगळया किटकनाशकाची फवारणी करणे आवश्यक असते. परंतु फवारणीचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीकोनातुन अशास्त्रीय पध्दतीने शिफारस नसतांना सुध्दा वेगवेगळया किटकनाशकांचे मिश्रण शेतक-याच्या स्वत:च्या अनुभवानूसार तसेच कृषि सेवा केंद्राच्या मार्गदर्शनानुसार तयार करून फवारणी केल्या जाते. अशा मिश्रणामुळे नविन प्रकारचे संयुग (विष) तयार होऊन तसेच मिश्रणातील संयुगाचे Concentration वाढुन विषाची तिव्रता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.
- तसेच पिक वाढ संजिवकांसह किटकनाशकाची फवारणी केल्यामुळे मिश्रणाच्या विषाची तिव्रता वाढुन नविन प्रकारचे विष तयार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विषबाधेची शक्यता जास्त निर्माण होते. वरीलप्रमाणे मिश्रण तयार करून सर्रास फवारणी केल्याचे निदर्शनास आले आहे. अशा शिफारशी नसलेल्या व अशास्त्रीय किटकनाशके मिश्रणामुळे विषबाधा झाल्यास प्राथमिक उपचार तसेच विशिष्ट प्रतिविष (Antidote) ची निवड करून उपचार करणे शक्य होत नाही.
- केंद्रीय किटकनाशक संस्था व , फरीदाबाद, हरीयाणा (CIB & RC) मार्फत Gibbralic Acid (GA), Indol Acitic Acid (IAA), Indol Butearic Acid (IBA) यासारख्या पिक वाढ

संजिवकांना किटकनाशक कायदयाअंतर्गत नोंदणी केल्या जाते. या व्यतिरिक्त हयुमिक ॲसीड,नायट्रोबेंझीन,अमिनो ॲसीड इत्यादी अनेक अनधिकृत उत्पादने उदयोजकामार्फत (टॉनिक) उत्पादित करून कृषि सेवा केंद्रामार्फत विक्री केल्या जातात. अशी पिक वाढ संजिवके किटकनाशका सोबत मिश्रण करून सर्रास फवारणी केल्या जातात. रसायन शास्त्राच्या नियमानुसार अशा मिश्रणाची रासायनिक अभिक्रिया होऊन तिसरे रसायन किंवा दुय्यम उत्पादने तयार होते. अशा मिश्रणाची शास्त्रीय कसोटयांवर खात्री न केल्यामुळे मानवी आरोग्यास धोका संभावण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये बिगर नोंदणीकृत पिक वाढ संजिवकांची (PGR) व इतर उत्पादनांना परवाना असल्याशिवाय विक्रीस परवानगी देऊ नये असे समितीचे मत आहे.

- फवारणी करण्यासाठी प्रामुख्याने उच्च आकारमान फवारणी पंप (High Volume Spray) व अती कमी आकारमान फवारणी पंप (Ultra Low Volume Spray) अशा दोन प्रकारच्या फवारणी पंपाचा वापर केल्या जातो. उच्च आकारमान फवारणी पंपाचे फवारणी कण आकारमान (Droplet Size) मोठी असल्यामुळे हवेत न राहता खाली/झाडावर पडतो. तथापी अती कमी आकारमान फवारणी पंपाचे फवारणी कण अत्यंत सुक्ष्म असल्यामुळे फवारणी करतांना दाट धुके (Mist) निर्माण होते आणि हे कण हवेमध्ये जास्त वेळ तरंगत राहतात व त्यामुळे किटकनाशके फवारणी अंश श्वासोच्छवासाव्दारे शरीरात जाण्याचे प्रमाण वाढते.
- यवतमाळ जिल्हयात मागील काही वर्षापासून स्वयंचलीत फवारणी पंपाचा वापर मोठया प्रमाणात झाल्याचे आढळुन आले. हे पंप अती कमी आकारमान फवारणी पंप असून शेतामध्ये फवारणी करतांना दाट धुके (Mist) निर्माण करतात. तसेच श्रम कमी लागत असल्याने जास्तीत जास्त क्षेत्रावर कमी वेळेत फवारणी केली जाते. अशा पंपामुळे फवारणी केल्यामुळे आणि कुठलेही संरक्षण उपाययोजनांचा अवलंब न करणे, फवारणीची वेळ न पाळणे, एकच व्यक्तीने मोठया क्षेत्रावर सतत फवारणी करणे यामुळे फवारणी करणारी व्यक्ती सतत विषाच्या संपर्कात राहते त्यामुळे शरीरात विष भिनण्याच्या प्रक्रियेस चालना मिळते. स्वयंमचलित फवारणी पंपाचा वापर करून आवश्यकते पेक्षा जास्त किटकनाशकाचे प्रमाण वापरले जाते.
- प्रत्येक किटकनाशकासोबत कंपनीकडून प्राप्त झालेल्या माहिती पत्रिकेवरील सूचनेचे काटेकोरपणे पालन केले जात नाही. कंपनीकडून मिळणा-या माहिती पत्रिकेवर त्या कोणत्या पिक व किडींसाठी तसेच फवारणीसाठी वापरावयाच्या मात्रेसह इतर माहिती असते व त्यानुसार फवारणी करणे गरजेचे असते. तथापी माहिती पत्रिकेवरील अक्षरे वाचनीय नसल्याने त्याचे आकलन व पालन होत नाही. तसेच शेतकरी/शेतमजुर स्वत:चे अनुभवाने आवश्यकते पेक्षा जास्त किटकनाशकाचे प्रमाण वाढवुन त्याची फवारणी करतो तसेच कृषि सेवा केंद्रामार्फत विविध किटकनाशकाचे अशास्त्रीय व शिफारस न केलेले मिश्रण **(किटकनाशके + पि जी आर + पाण्यात विद्राव्य खते)** प्रस्तावित केल्या जाते त्यामुळे विषाची तिव्रता वाढते. विहित प्रमाणापेक्षा पाण्यामध्ये किटकनाशकाची जास्त मात्रा झाल्यास विषबाधेची शक्यता वाढते. तसेच शेतक-यांचे कृषि सेवा केंद्रामध्ये उधारी खाते असल्यामुळे शेतकरी कृषि सेवा केंद्राच्या

नियमित संपर्कात असतो व त्यांचे सल्याने कापूस व इतर पिकासाठी शिफारस नसलेले (उदा. Fipronil 40% + Imidacloprid 40%) व अति तिव्रता असलेले मिश्रणे वापरल्याचे निदर्शनास आले आहे.

- फवारणी झाल्यानतर स्व्च्छ आंघोळ न करणे, फवारणी दरम्यान वापरलेले कपडे न बदलणे, तेच कपडे न धुता परत - परत वापरणे, उष्णतामाण जास्त असल्यामुळे कमी कपडयांचा वापर करणे तसेच फवारणी करतांना हात न धुताच तंबाखु व गुटखा/खर्रा खाणे, विडी पिणे, व इतर सवयीमुळे विषबाधा होण्याची शक्यता वाढते.

**<u>कृषि विभागाबाबत निरिक्षणे -</u>**

- कृषि सेवा केंद्रांना कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत किटकनाशके विक्रीचा परवाना दिला जातो. सदर विक्री परवान्यामध्ये उगम प्रमाणपत्राचा समावेश करण्याबाबत किटकनाशक कायदा, 1968 मध्ये तरतुद आहे. कंपनीच्या उगम प्रमाणपत्रामध्ये कंपनीला केंद्रीय किटकनाशके संस्था व पंजीकरण् समिती, फरिदाबाद, हरियाणा (CIB & RC) यांचे मार्फत मान्यता असलेल्या सर्व किटकनाशक कंपनीच्या उत्पादनाचा समावेश केला असल्यामुळे एखादया पिकाला शिफारशीत नसलेली किटकनाशके सुध्दा पिक नसलेल्या भागातील कृषि सेवा केंद्रात विक्रीसाठी उपलब्ध होतात. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दिलेल्या किटकनाशक परवान्यामध्ये किटकनाशकाच्या उगमप्रमाणपत्राचा जिल्ह्यात गुणनियंत्रण निरिक्षकांमार्फत तपासणी दरम्यान शिफारस नसलेल्या किटकनाशकांची विक्री बाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे निदर्शनास आले नाही. परवाना प्राधिकारी म्हणुन कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी मागील पाच वर्षात परवाना पध्दतीवर प्रभावी नियंत्रण ठेवलेले नाही. इतर जिल्हयात सुध्दा हिच परिस्थिती आहे.
- यवतमाळ जिल्हयात 16 तालुके असून जिल्हास्तरावर पुर्णवेळ जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकाचे काम करण्यासाठी केवळ एकच पद असून तेही दोन वर्षापासून रिक्त आहे. तालुका कृषि अधिकारी, आर्णी या कार्यालयातील कृषि अधिकारी यांना त्यांची नियमित कामे करून जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यवतमाळ कार्यालयातील जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक व तंत्र अधिकारी, विस्तार असे दोन महत्वाचे अतिरिक्त पदभार पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे देण्यात आले होते. वरील तिनही कार्यभार हे अतिशय महत्वाचे व जबाबदारीचे आहेत. तसेच अर्धवेळ निरिक्षक म्हणुन उपविभागीय कृषि अधिकारी, तंत्र अधिकारी, व्दारा - उपविभागीय कृषि अधिकारी तसेच तालुका कृषि अधिकारी हे गुणनियंत्रण विषयक कामे पाहतात. उपविभागीय कृषि अधिकारी यांची 4 पैकी 1, तंत्र अधिकारी यांचे 4 पैकी 2 पदे तसेच तालुका कृषि अधिकारी यांचे 16 पैकी 10 पदे रिक्त असून रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार कृषि अधिकारी तसेच काही ठिकाणी कृषि पर्यवेक्षक यांना देण्यात आलेला आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या गुणनियंत्रण विभागातील कृषि विकास अधिकारी यांचे अधिनस्त असलेले मोहीम अधिकारी हे गुणनियंत्रण व किटकनाशक नियंत्रकाचे महत्वाचे पद तिन

वर्षापासून रिक्त असून तालुका स्तरावर कार्यरत असलेले अर्धवेळ गुणनियंत्रण निरीक्षक तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती स्तरावरील निरिक्षकांना गुणनियंत्रणाच्या कामांसोबतच जलपुर्ती धडक सिंचन विहीर योजना अशी महत्वाची कामे करावी लागली. जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक, मोहीम अधिकारी, जिल्हा परिषद, व पंचायत समिती गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक यांनी आपल्या कार्यक्षेत्रात प्रभावी नियंत्रण ठेवले नाही. कृषि विभागामार्फत यवतमाळ जिल्हयातील 16 ही तालुक्यामध्ये गुणनियंत्रण विषयक सर्व कृषि केंद्र संचालकांचे 16 प्रशिक्षणे तसेच मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय प्रशिक्षण खरीप हंगामापुर्वी घेण्यात आलेले आहे. तसेच तालुकास्तरीय भरारी पथकामार्फत 909 किटकनाशके कृषि सेवा केंद्रा पैकी 909 कृषि केंद्राची 100 टक्के तपासणी केलेली असून माहे ऑक्टोबर 2017 अखेर 197 नमुने लक्षांकानुसार 205 नमुने (104 टक्के) काढलेले असून नमुन्यांचे लक्षांक पुर्ण केल्याचे अहवालानुसार आढळुन आलेले आहे. तसेच विषबाधा प्रकरणानंतर स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त समिती मार्फत दोषी आढळलेल्या 2 किटकनाशके उत्पादक कंपनी, 10 कृषि सेवा केंद्रावर गुन्हे दाखल करण्यात आलेले असून 5 कृषि सेवा केंद्राचे परवाने रद्द करण्यात आलेले असून किटकनाशकाचे 76 प्रकरणात विक्रीबंद आदेश देण्यात आलेले आहेत.

- किटकनाशक फवारणीमुळे विषबाधा होऊ नये म्हणुन क्षेत्रीय पातळीवर करण्यात आलेली जनजागृती -

i) 1873 गावामध्ये ग्रामपंचायत वार्तांफलकावर संदेश लिहण्यात आले.

ii) 1000 भिंती पत्रके वाटण्यात आले.

iii) 52,600 घडी पत्रीकेचे वितरण करण्यात आले.

iv) 1200 कृषि सेवा केंद्रामध्ये माहितीचे पोष्टर लावण्यात आले.

v) जिल्हा व तालुक्यातील कृषि केंद्र संचालकाची सभा घेवून निर्देश देण्यात आले.

vi) 940 गावामध्ये ग्रामसभा घेवून मार्गदर्शन करण्यात आले.

vii) वृत्तपत्रातुन बातम्या तसेच आकाशवाणी व्दारे जनजागृतीबाबत संदेश प्रसारीत करण्यात आले.

viii) 13,340 सरंक्षित किटचे वाटप करण्यात आले.

ix) कृषि, महसूल व आरोग्य विभाग यांचे सयुक्त विद्यमाणे 9 तालुक्यात आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

x) किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पातंर्गत आर्थीक नुकसानीच्या वर आढळलेल्या किडींच्या नियंत्रणासाठी 1,69,808 नोंदणीकृत शेतक-यांना आत्तापर्यंत विद्यापिठाच्या शिफारशीने 20,30,806 संदेश (एसएमएस) पाठविण्यात आले.

- कृषि विभागाच्या उन्नत शेती संमृध्दी शेतकरी या अभियानाअंतर्गत यवतमाळ जिल्हयातील 1707 गावामध्ये तसेच विविध योजनेअंतर्गत 40 प्रशिक्षणे घेण्यात येवून अंदाजे 2112 शेतक-यांना पिक व्यवस्थापन तसेच किड नियंत्रणाबाबत प्रशिक्षणे देण्यात आले. (जोडपत्र -1)

- केंद्रीय किटकनाशक संस्था व पंजीकरण समिती, फरीदाबाद, हरीयाना (CIB & RC) यांचे मार्फत दर वर्षी नवनवीन किटकनाशकांना मान्यता देण्यात येते. नवीन किटकनाशक बाजारात विक्रीस उपलब्ध झाल्यावर त्याची शिफारस कृषि विद्यापिठाच्या कृषि संवादनिमध्ये नसल्याने कृषि विभागाला या नविन किटकनाशकाची माहिती होत नसुन शेतक-यांना याबाबत मार्गदर्शन करता येत नाही. कृषि विभाग केवळ कृषि विद्यापिठाने शिफारस केलेल्या किटकनाशकांचीच फवारणीसाठी शिफारस करतो. नवीन किटकनाशकाची परवानगी दिल्यानंतर व्यापक प्रमाणात राज्यात जनजागृती, प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी.
- रासायनिक किटकनाशकाची प्रामुख्याने परवानाधारक कृषि सेवा केंद्रामार्फत विक्री केल्या जाते. सदर कृषि केंद्राचे संचालक हे कृषि पदविधर नसल्यामुळे किटकनाशकाच्या वापराबाबत योग्य ते मार्गदर्शन प्रभावीपणे शेतक-यांना करू शकत नाही. त्यामुळे शिफारस नसलेले किटकनाशकांची विक्री तसेच अशास्त्रीय किटकनाशकाच्या मिश्रणाची शिफारस त्यांचे मार्फत केल्या जाते. तसेच विषबाधा झाल्यास प्राथमिक उपचार व प्रतिविष विषयक माहीती तसेच फवारणी करण्यापुर्वी घ्यावयाची काळजी याबाबत कृषि सेवा केंद्रामार्फत सविस्तर मार्गदर्शन केल्या जात नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.
- यवतमाळ जिल्हयामध्ये कापूस पिकाचे बीजी-2 बियाण्याचे कृषि सेवा केंद्रामार्फत 17,92,135 विक्री करण्यात आलेल्या पाकीटांची लागवड करण्यात आली. त्यामध्ये सर्व वाणामध्ये मागील वर्षी पेक्षा सन 2017 च्या खरीप हंगामामध्ये रस शोषन करणा-या किडी व गुलाबी बोंडअळी यांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळुन आल्याने फवारणीच्या संखेमध्ये वाढ दिसुन आली. सन 2006 मध्ये बीजी-2, दोन जनुकीय असलेले (Cry 1Ac + Cry 2Ab) लागवडीकरीता मंजुर करण्यात आले. परंतु सन 2009 मध्ये बीजी - 2 संकरीत वाणावर गुलाबी बोंड अळींचा प्रादुर्भाव आढळुन आला. सन 2014 नंतर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव सर्व प्रकारच्या बीजी-2 बीटी बियाण्याच्या सर्व वाणावर सर्वत्र आढळल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. गुलाबी बोंड अळीची प्रतिकारशक्ती वाढल्यामुळे बीजी-2 वाण प्रभावी नसल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे बीजी-2 संकरीत वाणावर सुध्दा किटकनाशक फवारणीचे प्रमाण वाढलेले दिसून आले.

**वैद्यकीय शिक्षण व आरोग्य विभागाबाबत निरिक्षणे -**

अमरावती विभागातील यवतमाळ जिल्हयात किटकनाशक फवारणीमुळे विषबाधा झालेल्या तसेच किटकनाशक प्राशनाने भरती झालेल्या रूग्णांची संख्या महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त आहे. यवतमाळ प्रशासनाच्या आकडेवारीनुसार किटकनाशक फवारणीच्या विषबाधेमुळे सन 2016 - 17 मध्ये 434 रूग्ण तर सन 2017 - 18 मध्ये 886 रूग्ण उपचारासाठी दाखल झाल्याची नोंद आहे. मात्र यवतमाळ आणि अकोला येथील शासकीय महाविद्यालयांच्या भेटीत असे निदर्शनास आले की, यवतमाळ शासकीय महाविद्यालयात दरवर्षी मोठया प्रमाणात किटकनाशकाची फवारणी/प्राशन केल्याने बाधीत रूग्ण मोठया प्रमाणात भरती होत असतांनाही येथे विषबाधीतासाठी समर्पीत अति दक्षता कक्ष (ICU) नाही. तसेच विषबाधा झालेल्या रूग्णांना योग्य निदान होण्याच्या दृष्टीने आवश्यक असणारी Cholinestrase Test

खाजगी रित्या करून घ्यावी लागली. **यवतमाळ जिल्हयात आरोग्य विभाग व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विषबाधेमुळे बाधित रूग्णाची नोंद घेऊन अहवाल संकलीत करण्याची स्वतंत्रपणे कार्यप्रणाली विषबाधेच्या घटना घडेपर्यत अस्तितवात नव्हती.**

अमरावती विभागातील उपलब्ध आरोग्य सुविधा , विविध स्तरावर रूग्णाची भरती आणि मृत्यु झालेल्या रुग्णांचा संख्यात्मक अहवाल , विषबाधा झालेल्या रुग्णाच्या संख्येचा अहवाल व विभागात विषबाधेमुळे मृत्यु झालेल्या शेतक -यांची संख्यात्मक माहिती सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. (जोडपत्र क्र. 2, 3, 4 व 5)

- Cholinestrase Test ही Organophosphate Compound मुळे होणा-या विषबाधेसाठीच्या निदानासाठी महत्वाची चाचणी असूनही तसेच वैद्यकीय महाविद्यालय हे Tertiary Care Centre तथा Research Centre असूनही यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात या चाचणीची सुविधा उपलब्ध नव्हती. तुलनात्मकरित्या अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रूग्णांची संख्या यवतमाळ वैद्यकीय महाविद्यालयाच्या तुलनेत कमी असूनही गत तिन वर्षापासून रूग्णालय प्रशासनाने Cholinestrase Test करण्याची सुविधा उपलब्ध करून घेतलेली आहे.
- त्यामुळे यवतमाळ वैद्यकीय महाविद्यालयात मुख्यत्वे करून रूग्णांचा इतिहास (History) आणि रूग्णांच्या लक्षणावरूनच (Symptomatic) उपचार केले गेले. सन 2017 च्या ऑगस्ट, सप्टेंबर महीण्यात रूग्ण संख्येत जास्त वाढ झाली असूनही लक्षणाधारीतच उपचार देण्यात आले. **विशेष तपास पथकाचे मत आहे की, ही चाचणी उपलब्ध असती तर अधिक चांगल्याप्रकारे विशिष्ठ (Specific) उपचार होऊ शकले असते.**
- यवतमाळ जिल्हा भौगोलीक दृष्टया विस्तारीत असून मुख्यालयापासून वणी, पुसद, उमरखेड, मारेगांव, झरी यासारखे तालुके सरासरी 70 ते 120 कि. मी. अंतरावर आहेत. त्यामुळे रूग्णांना संदर्भीत (Refer) केल्यावर यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयात पोहचण्यास विलंब होतो. मात्र ग्रामिण/उपजिल्हा रूग्णालय (30 ते 50 Bed) स्तरावर अति दक्षता विभाग (ICU/Ventilator) सुविधा आकृती बंधात नसल्याने उपलब्ध नाही. त्यामुळे विषबाधेची लक्षणे दिसू लागताच रूग्णांना अतिदक्षता विभाग सूविधा असलेल्या तसेच नियमीत भिषक तज्ञ (MD Medicine) डॉक्टर उपलब्ध असलेल्या जिल्हास्तरावरील वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे संदर्भीत (Refer) करावे लागते.
- प्राथमिक केंद्र स्तरावरून प्राथमिक उपचार सलाईन देऊन रूग्ण थेट वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे संदर्भीत (Refer) करण्यात आले, असे दिसून आले.

## प्रतिबंधात्मक शिफारशी

### कृषि विभाग -

1) किटकनाशकाची फवारणी करतांना शेतकरी/शेतमजुर यांना झालेली विषबाधा प्रामुख्याने मोनोक्रोटोफॉस तसेच मोनोक्रोटोफॉस व इतर किटकनाशकाच्या मिश्रीत फवारणीमुळे मोठया प्रमाणात झाल्याचे निदर्शनास आलेले आहे. मोनोक्रोटोफॉस हे किटकनाशक अत्यंत विषारी (लाल त्रिकोण) व तुलनेने स्वस्त असल्यामुळे फवारणी करीता सर्रास वापर केल्या जातो. तसेच केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर व कृषि विद्यापिठ हे कापूस व इतर पिकावर मोनोक्रोटोफॉस या किटकनाशकाच्या अधिकृत वापराची शिफारस नसतांना सुध्दा जास्त प्रमाणात वापर केला जातो. मोनोक्रोटोफॉस हे किटकनाशक भाजीपाला पिकासाठी फवारणी करीता प्रतिबंधित आहे तथापी त्याच्या प्रत्यक्ष वापरावर नियंत्रण ठेवणे शक्य नाही**. त्यामुळे मोनोक्रोटोफॉस हे किटकनाशक तात्काळ प्रतिबंधीत करावे.**
2) बाजारात कंपनीमार्फत पुरवठा करण्यात आलेली नवनविन किटकनाशके (उदा. निकोटीनामाईड, थायोयुरीया या गटातील) यांना विशिष्ट प्रतिविष (Antidote) उपलब्ध नसल्यामुळे लक्षणानुसार उपचार (Symptomatic Treatment) करावे असे माहिती पत्रिकेवर नमुद केलेले असते. विशिष्ट प्रतिविष उपलब्ध नसल्याने व लक्षणानुसार उपचार या पध्द्तिने विषबाधीत रूग्णाला योग्य ते उपचार देणे शक्य होत नाही व विषबाधित रूग्ण दगावण्याची शक्यता जास्त असते. किटकनाशकाच्या नोंदणीसाठी केंद्रीय किटकनाशके संस्था व पंजीकरण समिती, (CIB & RC), फरिदाबाद, हरियाणा ही शिखर संस्था असून किटकनाशकाची नोंदणी करणे तसेच तांत्रिक बाबींवर केंद्र व राज्य सरकार यांना मार्गदर्शन करण्याचे अधिकार किटकनाशके कायदा, 1968 नुसार प्राप्त आहे. सदर संस्थेमार्फत नाविन किटकनाशकाची नोंदणी करण्यापुर्वी **विशिष्ट प्रतिविष उपलब्ध असल्याशिवाय मान्यता देण्यात येऊ नये असे समितीचे स्पष्ट मत आहे.**
3) किटकनाशकाची नोंदणी करण्यापुर्वी इतर किटकनाशकासोबत सुसंगती दर्शक तक्ता (Comptability Chart) माहिती पत्रिकेवर लिहणे बंधनकारक करावे. तसेच माहिती पत्रिकेवरील अक्षरे वाचनिय नसल्याने त्याचे आकलन व पालन होत नाही, तसेच बहुतांश: शेतकरी/शेतमजुर यांना अधिक प्रभाविपणे किटकनाशकामधील माहीती पत्र हे सचित्र (Pictorial) प्रकाराचे असावे तसेच किटकनाशकाच्या प्रत्येक डब्यासमवेत (Container) किटकनाशकाचे प्रमाण (Quantity) सुयोग्य् असे झाकन (मोजमापक) प्रत्येक डब्यासमवेत देणे बंधनकारक करावे. म्हणजे किटकनाशकाची फवारणी करतांना किटकनाशकाची योग्य मात्रा देणे सोईचे होईल याबाबत केंद्रीय किटकनाशके संस्था व पंजीकरण समिती, (CIB & RC), फरिदाबाद, हरियाणा यांनी योग्य ती कार्यवाही करावी ही शिफारस करण्यात येत आहे.
4) पिक वाढ संजिवके व रासायनिक किटकनाशके ही प्रामुख्याने एकत्रीत स्वरूपात फवारणी करत असल्यामुळे फवारणी करतांना संपर्क आल्यास विष शरीरामध्ये भिनन्याच्या प्रक्रियेला

मदत होते. सर्व प्रकारची पिक वाढ संजिवके (PGR) यांचे नोंदणी ही केंद्रीय किटकनाशके संस्था व पंजीकरण समिती, फरिदाबाद, हरीयाणा (CIB & RC) व राज्यस्तरावरून उत्पादनाचा परवाना घेऊन नंतरच विक्रीस संबधीत राज्यात परवानगी देण्यात यावी. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परषिद यांनी आपल्या जिल्ह्यामध्ये अशा नोंदणीकृत व विक्रीस परवानगी असलेल्या पिक वाढ संजिवके (पीजीआर) यांनाच विक्री परवाना देण्यात यावा. परवाना नसल्यास महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सीपीएस-1117/प्र.क्र.16/17अे(2), मंत्रालय, मुंबई दिनांक 03.10.2017 नुसार प्रचलित कृषि निविष्ठा कायदयामध्ये समाविष्ट नसलेल्या बिगर नोंदणीकृत पीक वाढ संजिवके व उत्पादनांची विक्री परवानाधारक दुकानांमधून न करणेबाबत निर्बंध घालण्यात आलेले आहे. तथापी बिगर परवानाधारक दुकानामधुन अशी अनोंदणीकृत पिक वाढ संजिवके विकण्यास कुठलाही निर्बंध नाही. त्यामुळे अशा प्रत्येक पिक वाढ संजिवकाबाबत इतर किटकनाशकामध्ये मिसळुन फवारणी केल्यास होणा-या अभिक्रियांची शास्त्रीय माहिती सदर उत्पादकाने सादर करून त्याच्या वापरामुळे व इतर किटकनाशकांसोबतच्या वापरामुळे मानवी आरोग्यास संभाव्य धोका होणार नाही याची शास्त्रीय कसोटयांवर खात्री पटल्याशिवाय **कोणत्याही पिक वाढ संजिवकांची नोंदणी व विक्री परवानगी दिली जाणार नाही अशी तरतुद करणे आवश्यक आहे.** तसेच किटकनाशक कायदयामध्ये नोंदणी केल्याखेरीज कोणत्याही पिक वाढ संजिवकांचे उत्पादन करून शेतीसाठी विक्री करणे हा गंभीर गुन्हा ठरविण्यात येऊन त्यासाठी कठोर शिक्षेची तरतुद करण्यात यावी. हा मुद्दा मानवी जिविताशी आणि एकुणच पर्यावरण सर्वधनाशी निगडित असल्यामुळे याबाबत तातडीने केंद्रीय कायदयात सूधारणा करण्यासाठी राज्य शासनाने प्रस्तावित करावे. तोपर्यंत राज्य शासनाने परवानाधारकासह बिगर परवानाधारक विक्रेत्यामार्फत पिक वाढ संजिवकांची विक्री न होण्यासाठी समग्र कायदा महाराष्ट्र राज्यासाठी तयार करावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

5) विषबाधा रोखण्यासाठी रासायनिक किटकनाशकांना पर्याय म्हणुन बिगर विषारी जैविक किटकनाशकांच्या (Bio Pesticides & Bio Agents) उत्पादनाला चालना देणे गरजेचे आहे. तथापी सद्यास्थितित केंद्रीय किटकनाशक संस्था व पंजीकरण समिती, फरीदाबाद, हरीयाना (CIB & RC) मार्फत किटकनाशकाची नोंदणी करण्याची पध्द्त अतिशय क्लिष्ट असल्यामुळे जैविक किटकनाशकांच्या उत्पादनास प्रोत्साहन मिळत नाही असे तपासणी पथकाचे मत आहे. तसेच केंद्र शासनाच्या जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळा, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, केंद्र कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, शासकीय जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळा यांना केंद्रीय किटकनाशक संस्था व पंजीकरण समिती, फरिदाबाद, हरियाणा (CIB & RC) नोंदणी व उत्पादनाचा परवाना देण्याची पध्दती सुलभ करून परवाना देण्यात येऊन मोठया प्रमाणावर उत्पादन करण्यात यावे. याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे योग्य तो प्रस्ताव पाठवावा.

6) रासायनिक कीडनाशकांचा वापर कमी करण्याच्या उद्देशाने जैविक किडनाशकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करून प्रचार व प्रसार करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

7) किटकनाशक फवारणी करण्यासाठी बाजारात दरवर्षी नव नविन फवारणी पंप विक्रीस उपलब्ध असतात. अशा आधुनिक पंप वापरण्याची पध्दत शेतकरी/शेतमजुरास माहीत नसल्याने विषबाधा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे बाजारात येणारे किटकनाशकाच्या फवारणी साठी वापरात येणा-या पंपांचे BIS मार्फत प्रमाणिकरण सक्तीचे करावे. तसेच 'काय करावे व काय करू नये' (Do's And Dont's) असे सचित्र दर्शवीणे सक्तीचे करावे अशी शिफारस करण्यात येत आहे.
8) तसेच केंद्र शासनाने खताच्या विक्रीवरील नियंत्रणासाठी निर्माण केलेली POS System किटकनाशकांच्या बाबतीत निर्माण करावी. तसेच e - portal तयार करून किटकनाशकाच्या वाहतुक/साठवणुक/विक्रीवर नियंत्रण ठेवावे. तसेच संख्यात्मक (Data Base) ग्रामस्तर ते राज्यस्तरावर तयार करून किटकनाशकाची वापराची माहिती उत्पादन, साठवणुक, विक्री, फायदा (Benefit) व दुष्परिणाम याची सर्व समावेशक माहिती जनहितार्थ उपलब्ध होईल व त्यामुळे उत्पादन वाहतुक विक्रीवर सनियंत्रण ठेवणे सोपे जाईल. त्यासाठी किटकनाशकाचे e-portel राज्य शासनाने तात्काळ तयार करण्याची समिती शिफारस करत आहे.
9) कृषि विभागाच्या किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पाच्या (क्रॉप सॅप) सर्वेक्षणामध्ये आढळुन आलेले किडिंचे Hot Spot निश्चित झाल्यावर जिल्हा प्रशासनाने शास्त्रज्ञाच्या चमुसह क्षेत्रीय भेट देऊन तात्काळ मार्गदर्शन करावे.
10) अमरावती विभागात कापूस हे पिक वर्षानुवर्ष एकाच जमिनीवर तसेच फरदड (Extended Cotton Crop) मोठया प्रमाणात घेतल्या जाते. त्यामुळे गुलाबी बोंड अळींचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात आढळुन येतो. यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन कापसाच्या जिनिंग प्रेसिंग कारखान्यात गुलाबी बोंड अळींच्या पुढील पिढींच्या प्रजननावरील नियंत्रणासाठी कामगंध सापळे लावण्याबाबत राज्य शासनाने धोरणात्मक कार्यवाही करावी व ही जबाबदारी कापूस जिनिंग व प्रक्रिया केंद्र यांचेवर असावी.
11) सध्या परिस्थितीत कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडून परवाना विषयक अधिकार काढणे तसेच गुणनियंत्रण कामाचे योग्य ते सनियंत्रण होण्याच्या दृष्टीकोणातुन शासनाने एकसमान आकृतीबंध तयार करून स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी व अशा गुणनियंत्रण विषयक काम करणा-या गुणनियंत्रन निरिक्षकांना कुठल्याही परिस्थितीत गुणनियंत्रण कामाशिवाय अतिरिक्त कार्यभार देण्यात येवू नये.
12) परवाना प्राधिकारी यांनी तालुकानिहाय कृषि सेवा केंद्र संचालक/वितरक यांचे प्रशिक्षण हंगामापूर्वी (खरीप व रब्बी) किमान दोन वेळा नियोजन करून कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ, कृषि विभाग, किटकनाशके उत्पादक कंपनी, किटकनाशक उत्पादक कंपन्यांच्या असोसिएशनची, कृषि विज्ञान केंद्र, कृषि विद्यालय, भारतीय कृषि विज्ञान परिषद (ICAR), खाजगी व शासकीय संबंधीत संशोधन संस्था, प्रादेशिक न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा (FSL) मार्फत विषबाधेबाबत प्रशिक्षण दयावे.
13) ग्रामस्तरावर '**ग्राम कृषि समितीची**' स्थापना करून हंगामातील प्रत्येक पाक्षिक सभेमध्ये विषबाधा होऊ नये म्हणुन करावयाच्या उपाय योजना विषबाधेबाबत घ्यावयाच्या काळजीचे

घडीपत्रीकेचे वाटप व चर्चा करावी. तसेच आरोग्य विभागामार्फत प्राप्त स्वास्थ आरोग्य प्रमाणपत्र असणा-या व्यक्तीसच फवारणी करण्यासाठी प्रवृत्त करावे. फवारणी करणा-या शेतमजुरास संरक्षण किट पुरविण्याची जबाबदारी ही शेत मालकाची आहे याबाबत समितीने शेत मालकास जाणीव करून दयावी. तसेच शेतमजुर व अन्य व्यक्तीस विषबाधा झाल्यास त्याच्यावर तात्काळ प्रथमोपचार करावेत. सुसंगती दर्शक तक्त्यामध्ये शिफारस नसलेले अशास्त्रिय मिश्रणे तसेच पिक वाढ संजिवके वापरण्यापासून शेतक-यांना परावृत्त करण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन ग्रामस्तरावर असलेल्या शासकीय यंत्रणेमार्फत करावे.

14) किटकनाशकाचे अप्रमाणित आढळुन आलेल्या नमुन्यांविरूध्द दाखल कोर्ट केसेस जलदगती न्यायालयात चालविण्यात याव्या जेणे करून दोषी आढळुन आलेल्या किटकनाशके उत्पादक कंपन्याविरूध्द वेळीच योग्य ती कठोर कार्यवाही होईल.

**कृषि सेवा केंद्र व किटकनाशके उत्पादक निगडीत निष्कर्ष** -

**i)** किटकनाशके विक्री कृषि सेवा केंद्राचा नविन परवाना देतांना केंद्र शासनाचे कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभागाचे राजपत्र दिनांक 05.11.2015 चे काटेकोर पालन करून कृषि पदवी किंवा तत्सम अभ्यासक्रम असलेल्या व्यक्तीसच परवाना देण्यात यावा. **तसेच राजपत्रामध्ये नमुद विहीत अर्हता प्राप्त नसणा-या जुने किटकनाशके विक्री परवानाधारक संचालकाने विक्री व मार्गदर्शनासाठी राजपत्रामध्ये नमुद अर्हता प्राप्त व्यक्तीची नियुक्ती करावी.**

ii) कृषि सेवा केंद्र संचालकांनी शिफारशीत असलेल्याच किटकनाशकांची विक्री करावी. शक्य असल्यास केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर व कृषि विद्यापिठ यांचे कृषि संवादनीत शिफारस असलेल्या किटकनाशकाची विक्री करावी व त्यासाठी शेतक-यांना योग्य सल्ला व मार्गदर्शन करावे. तसेच विषबाधा जन जागृती बाबत हंगामामध्ये शेतक-यांना विषबाधा होऊ नये म्हणुन शेतक-यांनी घ्यावयाची काळजी, कंपन्यांकडून प्राप्त मोफत किटकनाशके फवारणी संरक्षण किट चे वाटप, विषबाधा झाल्यास प्राथमिक उपचार तसेच प्रतिविष (Antidote) बाबत शेतक-यांना मार्गदर्शन प्रभावीपणे व स्पष्टपणे माहिती देणे बंधनकारक करावे.

iii) पिक वाढ संजिवके व दोन किटकनाशकाची अशास्त्रीय व सुसंगतीदर्शक तक्त्यात शिफारस नसलेले मिश्रणे हे किती घातक आहे याची स्पष्ट पणे व प्रभाविपणे शेतक-यांना माहिती देणे. यासाठी महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीपीएस 1117/प्र.क्र.193/17-अे, मंत्रालय मुंबई, दिनांक 12.10.2017 रोजीचे परिपत्रक शेतातील पिकांवर किटकनाशकाची फवारणी करतांना शेतमालक व शेतमजुर यांना विषबाधा होऊ नये म्हणुन करावयाच्या प्रतिबंधात्मक 20 उपायायोजनेबाबतची प्रत कृषि सेवा केंद्र चालकांनी उपलब्ध करून देण्यात यावी.

iv) केंद्रीय किटकनाशके संस्था, फरीदाबाद, हरीयाना यांनी लेबल क्लेम नुसार किटकनाशके वापराबाबत कायदयामध्ये आवश्यक ते बदल सूचवावे तसेच नविन किटकनाशकांना मंजुरी देतांना केवळ प्रतिविष (Antidote) असणा-या किटकनाशकाचीच नोंदणी करावी. तसेच प्रतिविष (Antidote) नसलेली किटकनाशकांच्या विक्रीवर बंधने आणण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस करावी.

v) तसेच केंद्र शासनाने खताच्या विक्रीवरील नियंत्रणासाठी निर्माण केलेली POS System किटकनाशकांच्या बाबतीत निर्माण करावी. तसेच e - portal तयार करून किटकनाशकाच्या वाहतुक/साठवणुक/विक्रीवर/बनावट कीटकनाशकांवर नियंत्रण ठेवावे. तसेच संख्यात्मक (Data Base) ग्रामस्तर ते राज्यस्तरावर तयार करून किटकनाशकाची वापराची माहिती उत्पादन, साठवणुक, विक्री, फायदा (Benefit) व दुष्परिणाम तसेच बनावट कीटकनाशके याची सर्व समावेशक माहिती जनहितार्थ उपलब्ध होईल व त्यामुळे उत्पादन वाहतुक विक्रीवर सनियंत्रण ठेवणे सोपे जाईल. त्यासाठी किटकनाशकाचे e - portel राज्य शासनाने तात्काळ तयार करण्याची समिती शिफारस करत आहे.

**vi) परवाना प्राधिकारी यांनी किटकनाशक परवान्यातील उगमपत्रामध्ये केवळ कंपनीचे नाव न लिहता त्या कंपनीच्या पिकनिहाय शिफारस असलेल्या किटकनाशकाची नावे परवान्यामध्ये नमुद करावी. जेणेकरून शिफारशीस नसलेली किटकनाशकाच्या विक्रीवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य होईल.**

vii) किटकनाशके उत्पादक कंपन्यांनी त्यांचे सर्वेक्षणात मागील वर्षाची विक्री तसेच संभाव्य विक्री होणा-या किटकनाशकाचा अंदाज घेऊन त्या त्या भागात मोफत फवारणी सरंक्षण किटचे वाटप, विषबाधेबाबत जनजागृती मोहीम व प्रशिक्षणाचे आयोजन सामाजिक उत्तर दायित्व (CSR) निधितुन करण्यास बंधनकारक करावे. तसेच प्रतिविष (Antidote) आगाऊ उपलब्ध करून तशी माहिती आरोग्य विभाग व कृषि विभागास दयावी.

**आरोग्य विषयक शिफारशी -**

1) अमरावती विभागात यवतमाळ व अकोला वैद्यकीय महाविद्यालयात ही दोन्हीही Tertiary Care Centre आहेत. या महाविद्यालयात नियमित किटकनाशक फवारणी आणि प्राशन केल्याने विषबाधा होणारे रूग्ण औषधोपचारासाठी येत असतात. त्यामुळे दोन्ही रूग्णालयात अद्यावत आणि स्वतंत्र सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी यवतमाळ वैद्यकीय महाविद्यालयात 30 खाटांचे आणि अकोला येथे शासकीय महाविद्यालयात 20 खाटांचे स्वतंत्र व सुसज्ज अति दक्षता विभाग (ICU) सुरू करण्यात येणे आवश्यक आहे, अशी समितीची शिफारस आहे.

2) यासोबतच यवतमाळ जिल्हयातील भौगोलीक परिस्थिती बघता वणी, पुसद येथील उपजिल्हा रूग्णालयात 5 खाटांचे सुसज्ज अति दक्षता विभाग (ICU) सुरू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

3) यवतमाळ शासकीय महाविद्यालयात Cholinestrase Test करण्याची सुरूवात आता करण्यात आलेली आहे. मात्र यासोबतच Organophosphorus व्यतीरिक्त इतर किटकनाशकामुळे होणा-या विषबाधेसाठीच्या चाचण्यासाठी (शरीरातील किटकनाशकाचे प्रमाण तपासण्यासाठी) **विषबाधा शास्त्र प्रयोगशाळा (Toxicology Lab) गृह व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या समन्वयाने यवतमाळ शासकीय महाविद्यालय येथे सुरू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

4) **विषबाधा अद्यावत उपचाराबाबत यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयात अद्यावत संशोधन केंद्र (Centre of Excellence) तयार करण्याची शिफारस आहे.**

5) सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी दर सहा महिण्यांनी किटकनाशक विषबाधा निदान आणि उपचार याबाबत वैद्यकीय अधिकारी/उपचार करणारे महाविद्यालयातील डॉक्टर/खाजगी व्यावसायीक डॉक्टर यांची कार्यशाळा व सखोल प्रशिक्षण घेवून अद्यावत माहिती सर्वांना राहील याची दक्षता घ्यावी.

6) आरोग्य विभागामार्फत नोंदणीकृत फवारणी मजुर (Registered Spray Workers) यांची तपासणी करून अर्धवार्षिक शारिरीक स्वास्थ प्रमाणपत्र (Fitness Certificate) चे वितरण करावे.

7) आरोग्य विभागाने तज्ञाची समिती नेमुन किटकनाशक विषबाधेमुळे रूग्णांना संदर्भीत (Refer) करण्याबाबत Standard Operating Procedure (SOP) तयार करावी व SOP सर्व ग्रामिण रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, जिल्हा रूग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय व खाजगी व्यवसायीक डॉक्टर यांना देणे बंधनकारक करावे. तसेच "108 रुग्णवाहिकेद्वारे" संदर्भसेवा दरम्यान व्यवस्थापन शिष्टाचार (Management Protocol) तयार करावा आणि त्यानुसार प्रशिक्षण आयोजीत करून सर्व जिल्हयातील डॉक्टरांना अद्यावत SOP देण्यात यावी.

8) सद्या स्थितित किटकनाशक कायदा, 1968 अंतर्गत किटकनाशक नियम, 1971 चे कलम 37 अन्वये शेतकरी/शेतमजुर, संस्थे मध्ये फवारणीचे काम करणा-या मजुर किवा कामगार यांची नोंदणी व वैद्यकीय तपासणी करण्याची पध्दत अस्तितवात आहे. अशीच पध्दत शेतात फवारणीचे काम करणारे शेतकरी/शेतमजुर यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरोग्य विषयक शारिरीक तपासणी प्रभावीपणे करून ग्रामपंचायत स्तरावर प्रत्येक गावात कृषि सहाय्यकामार्फत नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. असे नोंदणीकृत शेतकरी/शेतमजुर हे फवारणी करण्याकरीता आरोग्य दृष्ट्या पात्र आहे किंवा नाही याची वैद्यकीय तपासणी नजिकच्या ग्रामिण रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, जिल्हा रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात करावी तसेच वैद्यकीय तपासणी विहीत प्रपत्रात करून शारिरीक स्वास्थ प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. असे प्रमाणपत्र त्यांनी वर्षातुन दोन वेळा प्राप्त करावे. हे प्रमाणपत्र बघुनच शेतक-यांनी शेतमजुराला फवारणी संरक्षीत किट पुरवून किटकनाशक फवारणीचे काम करावे. या प्रमाणपत्राची एक प्रत आरोग्य केंद्र, संबधीत शेतकरी/शेतमजुर, कृषि सहाय्यक व ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध करून दयावी. त्यानुसार कृषि

सहाय्यक/तलाठी/ग्रामसेवक यांनी वेळोवेळी सदर प्रमाणपत्राची ग्रामस्तरीय समितीमध्ये तपासणी करून खात्री करावी.

तपासणीमध्ये प्रमाणपत्र प्राप्त नसलेले किंवा फवारणीस आरोग्य दृष्टया सक्षम नसलेले शेतकरी/शेतमजुर फवारणी करत असेल तर अशा व्यक्ती विरुद्ध भा. द. वि. कलम 309 अन्वये आत्महत्येचा प्रयत्न (I.P.C. Section 309 Attempt to Suicide) नुसार ग्रामसेवक/तलाठी/कृषि सहाय्यक व्दारे गुन्हा दाखल करावा. तसेच आरोग्य प्रमाणपत्र नसलेले, आरोग्य दृष्या फवारणीस सक्षम नाही किंवा फवारणी किट शिवाय फवारणी करत आहे अशा शेतमजुरांना ज्यांनी फवारणीचे काम दिले अशा व्यक्ती विरुद्ध भा. द. वि. कलम 304 सदोष मनुष्य वध (I.P.C. Section 304 Culpable Homicide) अन्वये ग्रामसेवक/तलाठी/कृषि सहाय्यक व्दारे गुन्हा दाखल करावा व याबाबतचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कडे विहीत मार्गे सादर करावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सदरचा अहवाल जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासनाकडे देऊन कार्यवाही करावी. अहवाल सादर करण्याचे विहीत प्रपत्र कृषि विभागाने तयार करावे. अशी समितीची शिफारस आहे.

9)जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणात (District Disaster Control Room) सदरहु विषयाची आपत्ती म्हणुन समावेश करण्यात यावा. आपत्ती पुर्वी व आपत्ती नंतरच्या व्यवस्थापनाच्या उपाययोजना खात्रीपूर्वक, तत्परतेने व प्रभावीपणे राबविण्यात याव्यात. किटकनाशकाचा फवारणीचा कालावधी माहे ऑगस्ट ते नोव्हेंबर असून त्या त्या वेळेस शासकिय यंत्रणा, पोलीस यंत्रणा, वैद्यकिय यंत्रणेस अति दक्षतेच्या सूचना (High Alert) देण्यात येऊन परिस्थितीस परिणामकारकपणे तोंड देण्यासाठी पुर्व तयारी व व्यवस्थापण करण्यात यावे. किटकनाशक फवारणीच्या शिखर कालावधीत आरोग्य विभागाने प्राथमिक उपचार केंद्र, ग्रामिण रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, जिल्हा रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांच्या कडून विषबाधेबाबत दैनंदिन अहवाल घेऊन जिल्हाधिकारी यांना दुरध्वनीव्दारे, मोबाईल व्दारे, ई - मेल व्दारे अथवा पत्राने तात्काळ कळवावा. जिल्हाधिकारी यांनी सदरची माहिती विभागीय आयुक्त व कृषि-आयुक्त, यांना दैनंदिन कळवावे व विषबाधेचे प्रमाण व तिव्रता अधिक आढळुन आलेल्या भागात जिल्हाधिकारी यांनी आरोग्य विभाग, कृषि विभाग, कृषि शास्त्रज्ञ व पोलीस विभागाची संयुक्त समितीची स्थापना करून तात्काळ पाहणी करावी. तसेच विषबाधेचे कारण व प्रतिबंधात्मक उपाय योजनांबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

10)16 मे, 1980 च्या अधिसूचनेप्रमाणे संबंधित सर्व यंत्रणांच्या अधिका-यांनी विषबाधेचा नियमित मासिक अहवाल जिल्हाधिकारी व शासनास देणे बंधनकारक करावे.

-----*****-----

**<u>मुद्दा क्रमांक 2 - सदर मानव निर्मित आपत्तीवर प्रतिबंध घालण्याकरीता कायदयात तरतुदीची अंमलबजावणी करतांना घडलेल्या चुका, त्याकरीता जबाबदार व्यक्ती, संस्था व शासकीय/निमशासकीय अधिकारी/कर्मचारी निश्चित करणे.</u>**

1) किटकनाशके कायदा, 1968 नुसार 16 मे, 1980 च्या परिपत्रकाप्रमाणे जिल्हास्तरीय स्थापीत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य अधिकारी, प्राथमिक उपचार केंद्र, हिवताप अधिकारी, पोलीस निरिक्षक, संबधीत पोलीस स्टेशन, क्षेत्रीय वन अधिकारी वन विभाग, पशु वैद्यकीय अधिकारी, सर्व खाजगी रूग्णालय, गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी यांनी विषबाधा अहवाल विहीत प्रपत्रात पाठविणे क्रमप्राप्त होते. मात्र तसे अहवाल कोणत्याही विभागामार्फत शासनास सादर करण्यात आलेले नाही. तथापी परिपत्रकाप्रमाणे अहवाल सादर करण्यासाठीची पध्द्त कार्यान्वित झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. **तसेच सदर अहवालाबाबत शासन स्तरावरून कोणताही पाठपुरावा झालेला नाही.**

2) यवतमाळ प्रशासनाच्या कीटकनाशक फवारणी विषबा धेसबंधी आकडेवारी नुसार सन 2016 - 17 मध्ये 434 रूग्ण तर सन 2017 - 18 मध्ये 886 रूग्ण उपचारासाठी दाखल झाल्याची नोंद आहे. विशेष तपास पथकाने यवतमाळ येथील शासकिय वैद्यकिय महाविद्यालयास भेट दिली असता, विषबाधा झालेल्या रूग्णांना योग्य निदानासाठी आवश्यक असणारी Cholinestrase Test तपासणी करण्याची सुविधा वैद्यकिय महाविद्यालय, यवतमाळ येथे नसल्यामुळे रूग्णांना ती खाजगीरित्या करून घ्यावी लागली. त्यामुळे रूग्णाचा वेळ व पैशाच्या अपव्यय झाला.

3) यवतमाळ जिल्हयात सातत्याने आढळुन येणा-या विषबाधा तसेच विषप्राशनाच्या रूग्णाची वाढती संख्या लक्षात घेता वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांनी Medicine Department मध्ये किटकनाशकाच्या विषबाधेबाबत अद्यावत उपचार सोई सुविधा आणि संशोधन यामध्ये विशेष सुधारणा केल्याचे दिसून आले नाही.

4) यवतमाळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामिण रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय येथे पुरेसे तज्ञे, उपचारासाठी आवश्यक असणारे Cholinestrase Test व इतर रक्त तपासणीसाठी सुविधा नसल्यामुळे पुढील उपचारासाठी वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात आले. यवतमाळ जिल्हा भौगोलीक दृष्टया विस्तारीत असून मुख्यालयापासून वणी, पुसद, उमरखेड, मारेगांव, झरी यासारखे तालुके सरासरी 70 ते 120 कि. मी. अंतरावर आहेत. त्यामुळे रूग्णांना संदर्भीत (Refer) केल्यावर यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयात पोहचण्यास विलंब होतो. म्हणून Cholinestrase Test व इतर रक्त

तपासणीसाठी सुविधा **उपजिल्हा रूग्णालय येथे सुविधा उपलब्ध करण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

5) यवतमाळ जिल्हयात विषबाधा प्रकरणानंतर जिल्हा प्रशासना मार्फत स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त समिती (महसूल विभाग, पोलीस विभाग, कृषि विभाग) मार्फत 227 कृषि केंद्राची तपासणी करण्यात आली आणि त्यापैकी 2 किटकनाशके उत्पादक कंपनीवर व 10 कृषि सेवा केंद्राविरूध्द पोलीस गुन्हे दाखल केले. तसेच 5 कृषि सेवा केद्राचे परवाने रदद करण्यात आले आहे. परंतु यापूर्वी यवतमाळ मधिल गुणवत्ता नियंत्रण निरिक्षकांनी केलेल्या तपासण्या प्रभावीपणे न करता केवळ औपचारीकता म्हणुन तपासण्या केल्या व तपासणीत आढळुन आलेल्या उणिवावर कुठलाही पाठपुरावा किंवा ठोस कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही.

6) किटकनाशक कायदा, 1968 कलम 37 (नोंदणी आणि वैद्यकीय तपासणी), 38 (प्रथमोपचार), 39 (सरंक्षण किट) व 41 (प्रतिविष व प्राथमिक औषधी उपलब्ध्ता) या कलमा अंतर्गत असलेल्या तरतुदीच्या अमलबजावणीसाठी संबधीत विभागामार्फत सनियंत्रण यंत्रणा ( Monitoring Mechanism) स्थापीत करण्यात आली नाही असे दिसून आले.

-----*****-----

**<u>मुद्रा क्रमांक - 3 जिल्हयात बिगर परवाना किटकनाशकांची विक्रीचे प्रकरणी करण्यात आलेली कार्यवाही तसेच किटकनाशकांचे नमुने अप्रमाणित आढळून आलेल्या प्रकरणांवर करण्यात आलेली कार्यवाहीचे गुणात्मक विश्लेषण करून शिफारशी देणे.</u>**

1) यवतमाळ जिल्हयात किटकनाशके परवानाधारक कृषि केंद्रावर केलेली कार्यवाही -
यवतमाळ जिल्हयात तपासणी दरम्यान आत्तापर्यंत 10 कृषि सेवा केंद्र व 2 किटकनाशक उत्पादक कंपनीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. (जोडपत्र क्र. - 6), 5 कृषि सेवा केंद्रांचे किटकनाशक विक्री परवाने रद्द करण्यात आलेले आहे. तसेच 6 कृषि सेवा केंद्रांचे किटकनाशक विक्री परवाने निलंबीत करण्यात आलेले आहे (जोडपत्र क्र. - 7)

2) दोषी आढळलेल्या किटकनाशके कंपन्यांवर केलेली कार्यवाही -
अकोला येथे प्रमुख कंपन्यांचे मध्यभारताचे किटकनाशकाचे साठवणुक केंद्र आहे. सदर किटकनाशकाचे साठवणुक केंद्रातुन यवतमाळसह संपुर्ण विभागात किटकनाशकांचा पुरवठा केल्या जातो. या साठवणुक केंद्रांची तपासणी दरम्यान दोषी आढळुन आलेल्या 7 किटनाशकाचे साठवणुक परवान्यावर कायदयानुसार कार्यवाही करण्यात येवून किटकनाशकाचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. (जोडपत्र- 8) तसेच अकोला तपासणीत 2.79 लाख् ली. (किंमत रु. 13.96 कोटी) साठयास विक्रीबंद आदेश देण्यात आलेले आहेत.

3) अमरावती विभागात यवतमाळ जिल्हयासह किटकनाशकाचे सन 2013 ते 2017 मध्ये विभागात एकुण 4706 नमुने विश्लेषनाकरीता घेण्यात आले होते. त्यापैकी 240 किटकनाशक नमुने अप्रमाणित आढळुन आले होते. अप्रमाणित आढळुन आलेल्या नमुन्यावंर कायदयानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच सन 2017 - 18 मध्ये माहे ऑक्टोबर 2017 अखेर 940 नमुने काढण्यात आले आहे. त्यापैकी 13 नमुने विश्लेषनामध्ये अप्रमाणित आढळुन आले असून अप्रमाणित नमुन्याविरूध्द कायदयानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे (जोडपत्र क्र. 9).

4) अमरावती विभागामध्ये सन 2015 - 16 मध्ये 3, सन 2016 - 17 मध्ये 1 व माहे सप्टेंबर 2017 मध्ये 1 अशा 5 प्रकणात गुन्हे दाखल करण्यात आले असून विषबाधेनंतर यवतमाळ जिल्हयात 10 गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील पोलीस कार्यवाही सुरू आहे (जोडपत्र क्र.**10**).

-----*****-----

**<u>मुद्दा क्रमांक 4 - सद्या विक्री परवाना असलेले काही किटकनाशके, स्प्रे पंप इत्यांदींची विक्रीवर प्रतिबंध घालणे, आवश्यक असल्यास त्याबाबत शिफारशी करणे.</u>**

**1)** किटकनाशक फवारणी करतांना विषबाधेमुळे आजारी पडलेल्या रूग्णांशी तसेच मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांशी आणि गावक-यांशी चर्चा केल्यानुसार जास्तीत जास्त लोकांनी मोनोक्रोटोफॉस हे किटकनाशक इतर किटकनाशकांसोबत मिश्रण करून फवारणी केल्याचे निर्दशनास आले. मोनोक्रोटोफॉस हे जागतिक आरोग्य संघटने नुसार 1B या किटकनाशक प्रवर्गात येते. त्यानुसार ते अति विषारी (Red) प्रवर्गात मोडते. त्यामुळे मोनोक्रोटोफॉस जास्त प्रमाणात वापरल्यास विषबाधा होण्याची शक्यता वाढते. तसेच मोनोक्रोटोफॉस हे अशत: प्रतिबंधात्मक (भाजीपाला पिकांकरीता) असल्याने त्याच्या वापरावर सनियंत्रण करणे शक्य नाही. त्यामुळे प्रतिबंधित पिकांसाठीही त्याचा वापर होत असल्याचे दिसून आले. तसेच केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर व कृषि विद्यापीठ हे कापूस पिकावर मोनोक्रोटोफॉस या किटकनाशकाची अधिकृत वापराची शिफारस करीत नसतांना सुध्दा जास्त प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे मोनोक्रोटोफॉस या किटकनाशकावर तात्काळ प्रतिबंध घालावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

2) बिगर नोंदणीकृत पिक वाढ संजिवके (PGR) यांचे उत्पादन व विक्री, नोंदणी, प्रमाणिकरण व परवाना बंधनकारक करावे. परवाना नसलेल्या पिक वाढ संजिवकांना (PGR) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सीपीएस - 1117/प्र. क्र. 16/17 - अे - (2), मंत्रालय, मुंबई - 32, दिनांक 03.10.2017 नुसार प्रचलित कृषि निविष्ठा कायदयामध्ये समाविष्ट नसलेल्या बिगर नोंदणीकृत पीक वाढ संजिवके व उत्पादनांची विक्री केवळ परवानाधारक दुकानांमधून न करणेबाबत निर्बध घालण्यात आलेले आहे. तथापी बिगर परवानाधारक दुकानामधुन अशी अनोंदणीकृत पिक वाढ संजिवके विकण्यास कुठलाही निर्बध नाही. त्यामुळे अशा प्रत्येक पिक वाढ संजिवकाबाबत इतर किटकनाशकामध्ये मिसळुन फवारणी केल्यास होणा-या अभिक्रियांची शास्त्रीय माहिती सदर उत्पादकाने सादर करून त्याच्या वापरामुळे व इतर किटकनाशकांसोबतच्या वापरामुळे मानवी आरोग्यास संभाव्य धोका होणार नाही याची शास्त्रीय कसोटयांवर खात्री पटल्याशिवाय कोणत्याही पिक वाढ संजिवकांची प्रमाणिकरण नोंदणी व विक्री परवानगी दिली जाणार नाही अशी तरतुद करणे आवश्यक आहे. तसेच किटकनाशक कायदयामध्ये नोंदणी केल्याखेरीज कोणत्याही पिक वाढ संजिवकांचे उत्पादन करून शेतीसाठी विक्री करणे हा गंभीर गुन्हा ठरविण्यात येवून त्यासाठी कठोर शिक्षेची तरतुद करण्यात यावी **[भा.द.वि.३०४- सदोष मनुष्यवध (Culpable Homicide )]**. हा मानवी जिविताशी आणि एकुणच पर्यावरण संर्वधनाशी निगडित मुद्दा असल्यामुळे याबाबत तातडीने केंद्रीय कायदयात सूधारणा करण्यासाठी राज्य शासनाने प्रस्तावित करावे व तोपर्यत राज्य शासनाने परवानाधारकासह बिगर परवानाधारक विक्रेत्यामार्फत पिक वाढ संजिवकांची विक्री न होण्यासाठी समग्र कायदा महाराष्ट्र राज्यासाठी तयार करावा अशी शिफारस करण्यात येत आहे.

3) विशेष तपास पथकाच्या क्षेत्रीय भेटी दरम्यान असेही आढळून आले की, कमी श्रम आणि जास्त काम होत असल्याने स्वयंमचलीत फवारणी पंप फवारणी साठी वापरण्याकडे शेतक-यांचा कल वाढत आहे. मात्र या पंपाच्या वापराने शेतकरी/शेतमजुर यांनी वैयक्तीक सुरक्षा संसाधने न वापरल्यास किटकनाशकाची अधिक मात्रा श्वासोच्छवासाव्दारे/त्वचेव्दारे शरीरात जाऊन विषबाधा जास्त प्रमाणात होण्याची शक्यता बळावते. सदरची किटकनाशक फवारणी स्प्रे पंप ही सद्यास्थितीत प्रमाणिकरण केलेली नाहीत असे दिसून येते. त्यामुळे स्वयंमचलीत फवारणी पंप यांची विषबाधेचा धोका कमी होण्याच्या दृष्टीकोनातुन विक्री करण्यापुर्वी बाजारात येणारे सर्व फवारणी पंपांचे BIS प्रमाणिकरण करावे, तसेच **'काय करावे व काय करू नये' (Do's And Dont's)** असे सचित्र दर्शवीने सक्तीचे करावे. भविष्यात किटकनाशके फवारणी करीता कृषि विभागाने तात्काळ संरक्षण किट (PPE- Personal Protective Equipment Kit ) विकसित केल्यानंतर फवारणी पंपासोबत देण्याची जबाबदारी विक्रेत्याची राहील.

-----*****-----

**<u>मुद्रा क्रमांक 5 - यवतमाळ जिल्हयातील याप्रकारच्या प्रमुख/महत्वाच्या घटनांबाबत अहवाल देण्याच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांना अहवाल सादर न करण्यासंदर्भात झालेल्या उणीवा शोधुन काढणे. त्यास जबाबदार असणा-या विभागाची माहिती निश्‍चित करणे.</u>**

1) किटकनाशके कायदा, 1968 नुसार 16 मे, 1980 च्या परिपत्रकाप्रमाणे जिल्हास्तरीय स्थापीत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य अधिकारी, प्राथमिक उपचार केंद्र, हिवताप अधिकारी, पोलीस निरिक्षक, संबधीत पोलीस स्टेशन, क्षेत्रीय वन अधिकारी वन विभाग, पशु वैद्यकीय अधिकारी, सर्व खाजगी रूग्णालय, गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी यांनी विषबाधा अहवाल विहीत प्रपत्रात पाठविणे क्रमप्राप्त होते. मात्र तसे अहवाल कोणत्याही विभागामार्फत शासनास सादर करण्यात आलेले नाही. तथापी परिपत्रकाप्रमाणे अहवाल सादर करण्यासाठीची पध्द्त विकसित झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच सदर अहवालाबाबत शासन स्तरावरून कोणताही पाठपुरावा झालेला नाही.

   **उपरोक्त माहिती वेळीच मिळाली असती तर प्रशासनास वेळीच प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे शक्य झाले असते.**

2) किटकनाशक कायदा, 1968 कलम 37 (नोंदणी आणि वैद्यकीय तपासणी), 38 (प्रथमोपचार), 39 (सरंक्षण किट) व 41 (प्रतिविष व प्राथमिक औषधी उपलब्ध्ता) या कलमा अंतर्गत असलेल्या तरतुदीच्या अमलबजावणीसाठी संबधीत विभागामार्फत सनियंत्रण यंत्रणा (Monitoring Mechanism) स्थापीत करण्यात आली नाही असे दिसून आले.

-----*********-----

**मुद्रा क्रमांक - 6 या दुर्घटनेवर जिल्हा नियंत्रण कक्ष (District Disaster Control Room) व्दारे करण्यात आलेले सनियंत्रण, देखरेख व घटना नंतर करण्यात आलेले मदत कार्यबाबत निष्कर्ष.**

1) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी केलेल्या कार्यवाहीचा घटनाक्रम -

i) दि.11/09/2017 रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ या पदाचा प्रभार घेतला. जिल्हाधिकारी, यवतमाळ या पदाचा पदाचा प्रभार स्विकारल्यानंतर मी प्रथमत: जिल्ह्यात कार्यरत अधिकारी यांचेकडून जिल्ह्याची भौगोलीक परिस्थिती, पीक परिस्थिती व इतर विभागांकडून आवश्यक माहिती जाणुन घेतल्यानंतर जिल्ह्यातील उमरखेड, पुसद, कळंब व राळेगांव तालुक्यांचा दौरा केला.

ii) तथापी कृषी विभाग, आरोग्य विभाग, जिल्हा परिषदे अंतर्गत आरोग्य विभाग व कृषी विभाग, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, यवतमाळ किंवा इतर कोणत्याही विभागांनी यवतमाळ जिल्ह्यात किटकनाशकांची फवारणी करतांना विषबाधा होऊन शेतकरी / शेतमजुर मृत्युमुखी व आजारी पडून शासकीय दवाखान्यामध्ये मोठ्या संख्येने भरती होत असल्याची बाब तेव्हा माझे निदर्शनास आणुन दिली नाही.

iii) तद्नंतर काही शेतकऱ्यांनी दि.25/09/2017 रोजी माझी समक्ष भेट घेवुन सर्वप्रथम यवतमाळ जिल्ह्यात किटकनाशकांची फवारणी करतांना विषबाधा होऊन काही शेतकरी / शेतमजुर यांची प्रकृती गंभीर झाल्याची बाब माझे निदर्शनास आणुन दिली. सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर तातडीने दि.25/09/2017 सायंकाळी 5.00 वाजता रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, यवतमाळ व कृषी विकास अधिकारी, जि.प.यवतमाळ यांची बैठक आयोजित करण्यात आली. त्यानुसार प्राथमिक माहिती घेवुन योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यवतमाळ व कृषी विकास अधिकारी, यवतमाळ यांना निर्देशित करण्यात आले. सदर प्रकरणी बंदी असणाऱ्या किटकनाशकांचा वापर शेतकऱ्यांकडून होत आहे किंवा कसे? याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत तसेच किटकनाशकांच्या वापरामुळे शेतकऱ्यांना बाधा होऊ नये याबाबत काय उपाययोजना करण्यात आल्या याचा वस्तुस्थिती दर्शक अहवाल सादर करण्याबाबत व किटकनाशकांची फवारणी करतांना काय दक्षता घ्यावी याबाबतचे परिपत्रक जिल्हा कृषी विकास अधिकारी, यवतमाळ यांनी तयार करुन सदरचे परिपत्रक जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जि.प.यवतमाळ व जिल्हा कृषी विकास अधिकारी, यवतमाळ व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे संयुक्त स्वाक्षरीने

निर्गमित करणेबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जि.प.यवतमाळ व जिल्हा कृषी विकास अधिकारी, जि.प.यवतमाळ यांना सुचीत करण्यात आले.

iv) तसेच विषयांकीत प्रकरणी प्राप्त तक्रारी व वृत्त पत्रामध्ये प्रकाशीत झालेल्या बातमीनुसार सदर प्रकरणी बंदी असणारी किटक नाशकांचा वापर शेतकऱ्यांकडून होत आहे किंवा कसे याबाबत चौकशी करुन तात्काळ कार्यवाही करण्याबाबत तसेच वृत्त पत्रामधील बातमीमध्ये उपस्थित मुद्यांचे अनुषंगाने किटकनाशकांच्या वापराने शेतकऱ्यांना बाधा होवु नये याबाबत काय उपाययोजना करण्यात येत असुन वस्तुस्थिती दर्शक अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यवतमाळ व जिल्हा कृषी विकास अधिकारी जि.प.यवतमाळ यांना या कार्यालयाचे पत्र पत्र दि.26/09/2017 नुसार निर्देशित करण्यात आले.

v) तसेच विषयांकीत प्रकरणी दि.27/09/2017 रोजी सायंकाळी 6.00 वाजता पुन:श्च महसूल, कृषी व आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेवुन संपुर्ण आढावा घेण्यात आला. उक्त बैठकीस अधिष्ठाता, श्री.वसंतराव नाईक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ, जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यवतमाळ, कृषी विकास अधिकारी जि.प.यवतमाळ व वरिष्ठ शास्त्रज्ञ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यवतमाळ उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये शेतकऱ्यांनी किटकनाशके फवारणी करतांना घ्यावयाच्या काळजीबाबत सुचनांना दररोज सकाळी व संध्याकाळी धडक मोहिमेच्या स्वरुपात मुनादी व्दारे प्रसिध्दी देण्याबाबत व सदर कामाकरिता सद्यस्थितीत यवतमाळ जिल्ह्यात सुरु असलेल्या कर्ज माफी चावडी वाचनाचा उपयोग करावा तसेच तलाठी ग्रामसेवक व कृषी सेवक यांचा सुध्दा या कामामध्ये सहभाग घेवुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहचेल याची दक्षता घेण्याबाबत सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी व तालुका कृषी विकास अधिकारी, जि.प.यवतमाळ यांना सुचीत करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

vi) सदर प्रकरणी रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांची संपुर्ण माहिती एकत्रित स्वरुपात तात्काळ सादर करण्यासाठी व अशा रुग्णांना रुग्णालयातुन तात्काळ सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत व याबाबतच्या सुचना स्थानिक पातळीवर निर्गमित करण्याबाबत अधिष्ठाता श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ, जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ व जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ यांना सुचीत करण्यात आले.

vii) तसेच किटकनाशकांची फवारणी करतांना कोणती काळजी घेतली पाहीजे याचे सखोल ज्ञान शेतकरी / शेतमजुर यांना नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये याबाबत दक्षता घेण्याची जाणीव होण्याकरिता फवारणी करित असतांना कोणती दक्षता घेतली पाहीजे याबाबतच्या सुचना मुनादी मार्फत सर्व गावांमध्ये देण्याबाबत व दररोज सकाळी व संध्याकाळी धडक मोहीमेच्या स्वरुपात या सुचनांना मुनादी व्दारे प्रसिध्दी देण्याबाबत तसेच सदर कामाकरिता सद्यस्थितीत सुरु असलेल्या चावडी वाचनाचा उपयोग करुन तलाठी, ग्राम सेवक व कृषी सेवक यांचा सुध्दा या कामामध्ये सहभाग घेवुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहचेल याची दक्षता घेण्याबाबत सर्व उपविभागीय अधिकारी व सर्व तहसिलदार यांना या कार्यालयाचे पत्र दि.27/09/2017 नुसार सुचीत करण्यात आले होते.

viii) किटकनाशकांची फवारणी करतांना बाधीत होवुन मृत झालेल्या शेतकरी / शेतमजुर यांचे पोस्टमार्टम रिपोर्ट त्वरीत सादर करण्याबाबत अधिष्ठाता श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांना सुचीत करण्यात आले होते. त्यानुसार शवविच्छेदन अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

ix) याप्रमाणे तातडीने कार्यवाही करुन प्राथमिक अहवाल शासनास दि.27/09/2017 रोजी सादर करण्यात आलेला आहे.

x) **मा.पालकमंत्री, यवतमाळ जिल्हा** यांच्या अध्यक्षतेखाली व **मा.अध्यक्ष, कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, अमरावती** यांचे प्रमुख उपस्थितीत दि.28/09/2017 रोजी दुपारी 3.00 वाजता महसूल भवन, जि.का.यवतमाळ येथे विषयांकीत प्रकरणी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस अधिष्ठाता, श्री.वसंतराव नाईक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ, जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यवतमाळ, कृषी विकास अधिकारी जि.प.यवतमाळ व वरिष्ठ शास्त्रज्ञ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यवतमाळ उपस्थित होते. तसेच मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण हे देखील उपस्थित होते.

xi) कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ, अधिक्षक कृषी अधिकारी यवतमाळ व जिल्हा कृषी विकास अधिकारी, यवतमाळ यांनी किटकनाशकाची फवारणी कशा प्रकारे करावी याबाबत जागृती करावी, शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळा घ्याव्या, तालुका कृषी अधिकारी व कृषी सेवक यांचेमार्फत जिल्ह्यातील प्रत्येक गावामध्ये जावुन शेतकऱ्यांना फवारणीबाबत मार्गदशन करण्याचे निर्देश या वेळी देण्यात आले.

xii) शेतकऱ्यांना विषारी किटकनाशकांच्या फवारणीमुळे विषबाधा होत असल्यामुळे शेतकऱ्यांना मास्क व रबरी हातमोजे (सुरक्षा किट) बळीराजा चेतना अभियाना मार्फत

उपलब्ध करुन देण्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, ग्रामस्तरीय समित्यांनी गावातील शेतकरी यांची संख्या विचारात घेवुन एका गावाकरिता कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 10 इतक्या किट खरेदी कराव्यात व त्याबाबतची नोंद रजिस्टरला घ्यावी. सदर किट आवश्यकतेप्रमाणे फवारणीच्या कामी जाणाऱ्या व्यक्तीला उपलब्ध करुन द्यावी. व त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर ती स्वच्छ करुन ठेवावी व पुन्हा मागणीप्रमाणे इतरांना उपलब्ध करुन देण्याबाबत **मा.पालकमंत्री, यवतमाळ जिल्हा व मा.अध्यक्ष, कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, अमरावती** यांनी सदर सभेमध्ये निर्देश दिले. त्यानुसार यवतमाळ जिल्ह्यातील 1198 ग्राम पंचायतींना एकुण रु.1160500/- एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. त्यानुसार 4642 सुरक्षा किट खरेदी करण्यात आल्या असुन त्या तालुका यंत्रणे मार्फत शेतमजुरांना उपलब्ध करुन देण्याची काम युध्द पातळीवर सुरु आहे. तसेच इंट्रा प्रायव्हेट लिमीटेड कंपनी मार्फत 1800 किटचे वाटप एकुण पाच तालुक्यांमध्ये व बायर कंपनी कडून 200 सुरक्षा किटचे वाटप जिल्हा स्तरावर करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने आवश्यक पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच श्री.के.एस.नारायणन, महाव्यवस्थापक, सिंजेंटा इंडीया लि.नवी दिल्ली यांचे पत्र दि.13/10/2017 नुसार यवतमाळ जिल्ह्यामध्ये किटकनाशकांची फवारणी मुळे बाधीत होणारे शेतकरी / शेतमजुर यांचेकरिता 10000 संरक्षण किट उपलब्ध करुन देण्यात येत असुन त्या उपलब्ध करुन घेऊन ग्रामपंचायती मार्फत वाटप करण्याकरिता नियोजन करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना दि.13/10/2017 रोजीचे पत्रान्वये निर्देश देण्यात आले.

xiii) तसेच कृषी विभागाच्या तालुका व ग्रामस्तरीय अधिकारी यांनी महसूल विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्यासह गावोगावी जाऊन किटकनाशक फवारणी कशी करावी याबाबत तसेच तालुका कृषी अधिकारी व ग्रामीण रुग्णालय / प्राथमिक आरोग्य केंद्र येथील संबंधीत वैद्यकीय अधिकारी यांना सोबत घेवुन दि.28/09/2017 रोजी संबंधीत शेतकरी / शेतमजुर यांचे घरी जावुन भेट द्यावी व मृत्यु बाबत सविस्तर चौकशी अहवाल सादर करण्याबाबत सर्व तहसिलदार, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यवतमाळ, जिल्हा कृषी विकास अधिकारी, जि.प.यवतमाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ व जिल्हा शल्य चिकित्सक, यवतमाळ यांना दि.27/09/2017 रोजीचे पत्रान्वये सुचीत करण्यात आलेले आहे.

**xiv)** मा.प्रधान सचिव (कृषी) व आयुक्त (कृषी) दि.02/10/2017 रोजी दुपारी 1.00 वाजता महसूल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे बैठक आयोजित करुन याबाबत

सविस्तर आढावा घेतला. सदर बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ, सहाय्यक संचालक कृषी अमरावती, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यवतमाळ, कृषी विकास अधिकारी जि.प.यवतमाळ, अधिष्ठाता श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ, जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.यवतमाळ, वरिष्ठ किटक शास्त्रज्ञ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यवतमाळ, किटक शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ, सर्व उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा कामगार अधिकारी व तहसिलदार दारव्हा, केळापुर, आर्णी, मारेगांव, घाटंजी, कळंब, दिग्रस, झरीजामणी हे उपस्थित होते. उक्त बैठकीमध्ये विषबाधेमुळे मृत्युमुखी पडलेल्या शेतकरी / शेतमजुर यांची प्रकरणे मदतीकरिता मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन प्रस्ताव पाठविण्याच्या सुचना दिल्या तसेच त्याचा पाठपुरावा करुन त्यांना मदत उपलब्ध करुन देण्याच्या सुचनाही सदर बैठकीमध्ये देण्यात आल्या आहेत. एकुण 21 मृतक शेतकरी / शेतमजुर यांना मा.मुख्यमंत्री सहायता निधीतुन अर्थसहाय्य मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.सचिव, मा.मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, यांना सादर करण्यात आलेला आहे. शेतकरी / शेतमजुर यांचेपर्यंत जनजागृती मोहीमेव्दारे पोहचुन जास्तीत जास्त लोकांना याबाबीवर प्रबोधन करावे असे निर्देश कृषी सेवक यांना देण्यात यावे असे त्यांनी सुचीत केले.

xv) **मा.राज्यमंत्री (कृषी) महाराष्ट्र राज्य** यांनी यवतमाळ जिल्ह्याचा दौरा करुन दि.04/10/2017 रोजी मौजा शेंदुरसनी ता.आर्णी येथील मयत शेतकरी श्री.दिपक शामराव मडावी यांचे कुटुंबियांना भेट दिली. व त्यानंतर श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथे भेट देवुन रुग्णांची विचारपुस केली. तद्नंतर महसूल भवन जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे दुपारी 2.00 वाजता बैठक घेवुन यवतमाळ जिल्ह्यामध्ये किटकनाशकांच्या फवारणीमुळे विषबाधीत झालेल्या शेतकऱ्यांबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती घेतली. उक्त बैठकीस मा.आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ, जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ, जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.यवतमाळ, अधिष्ठाता श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ, संचालक निष्ठा व गुण नियंत्रण कृषी आयुक्तालय पुणे, विभागीय कृषी सह संचालक अमरावती, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यवतमाळ, सहायक आयुक्त (कामगार) अमरावती, जिल्हा कामगार अधिकारी यवतमाळ, सर्व उपविभागीय कृषी अधिकारी व सर्व तहसिलदार उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये संपुर्ण यंत्रणेला **मा.मंत्री महोदयांनी** आवश्यक ते निर्देश दिले.

xvi) फवारणीमुळे विषबाधा होऊन शेतकरी दगावत असतांना या घटनेची माहिती इतर विभागांना का दिली नाही याबाबत त्यांनी अधिकारी व कर्मचारी यांना विचारणा केली. रुग्ण कल्याण निधी मार्फत विषबाधीत शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याचे निर्देश दिले. विषबाधीत शेतकऱ्यांवर उपचार योग्य प्रकारे करण्यात यावा, त्यांना आवश्यकतेनुसार विटामिन्स, टॅबलेट्स, टॉनिक देण्यात यावे. सर्व डॉक्टरांची मिटींग घेवुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी यांचेकडे देण्यात यावा, असे निर्देश त्यांनी वैद्यकीय अधिकारी यांना दिले.

xvii) ज्या रुग्णांना औषधोपचारा नंतर सुट्टी देण्यात आली असेल अशा रुग्णांना यानंतरही बाधा जाणवु शकते याकरिता त्यांची तपासणी करुन त्यांना पुन:श्च आवश्यक असणारा उपचार देणेकरिता रुग्णालयातील दाखल रुग्णांची यादी त्या-त्या क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र / ग्रामीण रुग्णालय यांना उपलब्ध करुन द्यावी व अशा रुग्णांना प्रत्यक्ष भेटुन त्यांना स्थानिक पातळीवर उपचार उपलब्ध करुन देण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्यानुसार दि.04/10/2017 रोजी पत्र निर्गमित करण्यात येवुन अधिष्ठाता, श्री.वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ, जिल्हा शल्य चिकित्सक, यवतमाळ व जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.यवतमाळ यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

xviii) काही किटकनाशकांवर बंदी असुनही ही औषधे सर्रासपणे दुकानात विकल्या जातात अशा दुकानांवर कार्यवाही करण्यात यावी. लायसन्स व्यतिरिक्त असलेला साठा जप्त करण्यात यावा, या घटनेला दोषी आढळणाऱ्या कंपन्या आणि त्यांची विक्री करणाऱ्या कृषी केंद्र चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले. संबंधीत उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. त्यानुसार तालुका कृषी अधिकारी, पोलीस निरीक्षक व पंचायत समिती कृषी अधिकारी यांना अनाधिकृत / बोगस व विना परवाना विक्री केलेल्या / ठेवलेल्या बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके प्रकरणी कृषी निविष्ठा केंद्राची व गोदामांची तपासणी करुन पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात यावे याबाबत निर्देश दिले. सभेतील निर्देशाप्रमाणे चौकशी करणेकरिता खालीलप्रमाणे चौकशी समिती गठीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. त्यानुसार समिती गठीत करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १) संबंधीत विभागाचे उपविभागीय अधिकारी (महसूल) | - | अध्यक्ष |
| २) संबंधीत उपविभागीय कृषी अधिकारी | - | सदस्य |
| ३) संबंधीत तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी | - | सदस्य सचिव |
| ४) संबंधीत तालुक्याचे पोलीस निरिक्षक (ठाणेदार) | - | सदस्य |
| ५) संबंधीत पंचायत समिती कृषी अधिकारी (सामान्य) | - | सदस्य |

xix) सदर समितीने दि.05/10/2017 पासुन त्यांचे अधिनस्त उपविभागामध्ये चौकशी करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेले आहेत. ते अवलोकनार्थ यासोबत सादर करण्यात येत आहे.

xx) जिल्ह्यामध्ये तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी, कृषी सहायक यांनी नियमितपणे गावांना भेटी द्याव्यात, दैनंदिनी अद्यावत ठेवावी त्यामध्ये नोंदी घ्याव्यात. गावात जाऊन अशा घटना घडू नये म्हणुन प्रतिबंधात्मक उपाय योजावेत, शेतकऱ्यांना किटकनाशकांबाबत योग्य माहिती देण्यात यावी. असे निर्देश मा.मंत्री महोदयांनी दिले.

xxi) दि.06/10/2017 रोजी मा.मंत्री (कृषी) व मा.मंत्री (आरोग्य) यांनी यवतमाळ जिल्ह्याला भेट दिली. मा.मंत्री (कृषी) यांनी मौजा मानोली ता.घाटंजी येथील यमत शेतमजुर श्री.बंडू चंद्रभान सोनुले यांचे कुटुंबियांना दिली तसेच जिल्हा शासकीय रुग्णालयाला भेट दिली व त्यानंतर श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथे सकाळी 11.00 वाजता आढावा बैठक घेण्यात आली. तसेच तद्नंतर दुपारी 1.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये मा.मंत्री (कृषी), मा.पालकमंत्री यवतमाळ जिल्हा, मा.अध्यक्ष कै.वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबत मिशन, मा.खासदार भावनाताई गवळी व पालक सचिव श्री.व्ही.गिरीराज हजर होते. सभेत दिलेल्या निर्देशाप्रमाणे ज्या गावातील पोलीस पाटील यांना अशा काही घटना घडल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत तात्काळ पोलीस यंत्रणेस व पोलीस यंत्रणेने तालुका दंडाधिकारी यांना कळविणेबाबत आदेश निर्गमित करावे जेणेकरुन जिल्हा पातळीवर अशा घटनांबाबत तात्काळ माहिती उपलब्ध होईल याबाबत सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदार यांना दि.06/10/2017 रोजीचे पत्रान्वये निर्देश देण्यात आले.

xxii) तसेच ग्रामपंचायती मधील गावांमध्ये कृषी सहाय्यक व ग्राम सेवक यांचे मार्फत फवारणीबाबत प्रचार प्रसिध्दी करावी याबाबतचे नांवानिशी आदेश निर्गमित करावे जेणे करुन जिल्हा पातळीवरील अशा घटनांबाबत तात्काळ माहिती उपलब्ध होईल याबाबतच्या सुचना सर्व तालुका कृषी अधिकारी व सर्व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना दि.06/10/2017 रोजीचे पत्रान्वये निर्देश देण्यात आले.

xxiii) ग्रामीण व प्राथमिक रुग्णालय येथे कर्मचारी यांनी किटकनाशकांच्या फवारणी करतांना बाधीत होवुन शेतकरी / शेतमजुर मृत्यु पावल्याबाबत काय काळजी घ्यावी याबाबतच्या लिखीत स्वरुपाच्या सुचना (SOP) निर्गमित करुन तसा अहवाल सादर करणेबाबत

जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ व जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.यवतमाळ यांना दि.06/10/2017 रोजीचे पत्रान्वये निर्देश देण्यात आले.

xxiv) तसेच नियमानुसार किटकनाशक किंवा दुकान नियमित असल्याबाबत तपासणी करणे हे तालुका कृषी अधिकारी व कृषी अधिकारी पंचायत समिती यांची जबाबदारी असुन अशा प्रकारची तपासणी करण्याबाबतचे नावानिशी आदेश निर्गमित करुन तपासणीचा दैनंदिन आढावा घ्यावा व दैनंदिन आढाव्याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत सर्व उपविभागीय कृषी अधिकारी व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना दि.06/10/2017 रोजीचे पत्रान्वये निर्देश देण्यात आले.

xxv) सद्यस्थितीत यवतमाळ जिल्ह्यामध्ये 21 व्यक्ती (14 शेतकरी / 07 शेतमजुर) किटकनाशकांची फवारणी करतांना विषबाधा झाल्यामुळे मृत्युमुखी पडले असुन 15 मयतांचे शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाले आहेत. तीन शेतकरी / शेतमजुर यांचे शवविच्छेदन न करताच त्यांचेवर अंतिम संस्कार करण्यात आलेला आहे .

xxvi) किटकनाशकांच्या फवारणीमुळे यवतमाळ जिल्ह्यात दगावलेल्या व उपचार घेत असलेल्या शेतकऱ्यांची माहिती व प्रशासनाने केलेली कार्यवाही व प्रतिबंधात्मक उपाय याचा संपुर्ण आढावा घेण्यासाठी मा.श्री.एस.के.श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव (गृह) यांनी यवतमाळ जिल्ह्यास भेट देवुन दि.07/11/2017 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे बैठक घेतली.

xxvii) तसेच दि.08/10/2017 रोजी मा.अपर मुख्य सचिव (गृह) यांनी विश्राम गृह कळंब येथे फवारणीने बाधीत झालेल्या व रुग्णालयातुन सुटी झालेल्या काही व्यक्तींची भेट घेतली व त्यानंतर मौजा सावरगांव ता.कळंब येथे मृतक गजानन नामदेव फुलमाळी यांचे घरी भेट दिली.

xxviii) तसेच जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटीलांची पोलीस स्टेशन स्तरावर मिटींग घेवुन त्यांना अशा प्रकारचे कोणतीही अप्राकृतीक घटना घडल्यास त्याची माहिती त्वरीत पोलीस स्टेशनला देणे बाबत सर्व ठाणेदार यांना सुचना देण्याची तजविज ठेवली आहे. पोलीस यंत्रणा अशा प्रकारचा कोणताही अनुचीत प्रकार घडल्यास त्याची माहिती संबंधीत विभागास देण्यात येईल.

xxix) विषयांकीत प्रकरणी निर्देशित केल्याप्रमाणे यवतमाळ जिल्ह्यातील विषबाधा प्रकरणामुळे कृषी निविष्ठा केंद्रांचे रद्द केलेल्या परवान्याबाबत कृषी विकास अधिकारी, जि.प.यवतमाळ यांनी सादर केलेली यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कृषी केंद्राचे नांव | गांव | तालुका | परवाना क्रमांक | प्रो.प्रा. चे नांव | केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कृषी वैभव, यवतमाळ | यवतमाळ | यवतमाळ | LAID25010070 | दिलीप धोंडोपंत चिंतावार | परवाना निलंबन |
| 2 | कृषी प्रगती, यवतमाळ | यवतमाळ | यवतमाळ | LAID25010111 | दिलीप भाऊराव बोगावार | परवाना निलंबन |
| 3 | वैभव कृषी केंद्र, यवतमाळ | यवतमाळ | यवतमाळ | LAID25010100 | सतिश चंद्रशेखर कांडूरवार | परवाना निलंबन |
| 4 | कृषी संपदा | मारेगांव | मारेगांव | LAID25120048 | भुजंग सत्यनारायण वारारकर | परवाना निलंबन |
| 5 | उत्तरवार ॲग्रो एजन्सीज | मारेगांव | मारेगांव | LAID25120007 | प्रदीप वसंतराव उत्तरवार | परवाना निलंबन |

xxx) तसेच यवतमाळ जिल्ह्यातील फौजदारी गुन्हे दाखल केलेल्या कृषी केंद्रांबाबत कृषी विकास अधिकारी, जि.प.यवतमाळ यांनी सादर केलेली यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कृषी केंद्र चालकाचे नांव | केलेली कार्यवाही |
|---|---|---|
| १ | दिलीप धोंडोपंत चिंतावार, | एफआयआर क्र.1016, दाखल दि.07/10/2017 |
| २ | दिलीप भाऊराव बोगावार | एफआयआर क्र.1017, दाखल दि.07/10/2017 |
| ३ | संजय क.राजा | एफआयआर क्र.412, दाखल दि.07/10/2017 |
| ४ | प्रितम सुरेशचंद्र राठी | एफआयआर दाखल दि.07/10/2017 |
| ५ | सचिन प्रभाकर भेलोंडे | एफआयआर क्र.270, दाखल दि.07/10/2017 |
| ६ | जमालोद्दीन फीयामोद्दीन शेख | एफआयआर क्र.530, दाखल दि.08/10/2017 |
| ७ | दिपक भास्करराव कापत्रीवार | एफआयआर क्र.762, दाखल दि.08/10/2017 |

xxxi) दि.08/10/2017 रोजी श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथील सभागृहात डॉ.किर्ती पवार, इंन्टेसिविस्ट बारामती यांनी सध्या होत असलेल्या विष संपर्क विषबाधेसंबंधी वैद्यकीय महाविद्यालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांना अशा प्रकरणी वैद्यकीय उपचाराबाबतचे अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

xxxii) त्यांनी विषबाधीत झालेल्या रुग्णांना कसे ओळखावे तसेच त्यांना आवश्यक असलेल्या इंजेक्शन पाम व इंजेक्शन ॲट्रोपिन यांच्या मात्रा कशा प्रकारे कोणत्या वेळेस रुग्णांच्या प्रकृतीला अनुसरुन देण्यात याव्यात या विषयी उत्कृष्ठ असे बोधपर व्याख्यान दिले. यामध्ये कुठला रुग्ण वेन्टीलेटरवर केव्हा ठेवावा या विषयी मार्गदर्शन केले व रुग्णांच्या लक्षणावरुन त्यावर नियंत्रण कसे करावे याबाबत संबंधीतांना प्रशिक्षीत केले. रुग्णावर योग्य प्रकारे उपचार होवुन तो पुर्णपणे बरा होवु शकेल या विषयाचे मोलाचे मार्गदर्शन डॉ.किर्ती पवार यांनी केले.

xxxiii) विषयांकीत प्रकरणी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचे अनुषंगाने मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य महोदयांनी रु.2.00 लक्ष प्रमाणे एकुण 42 लक्ष इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मंजुर केलेले आहे.

xxxiv) सदर बैठकीमध्ये जिल्ह्यामध्ये सुमारे 886 शेतकरी / शेतमजुर फवारणीमुळे बाधीत झाले असल्याने शासन परिपत्रक महसूल व वन विभाग दि.25/10/2015 मधील (ब) मध्ये ग्राम स्तरीय समित्यांना दिलेल्या निधीचा वापर जिल्हा स्तरीय समितीच्या पुर्व मान्यतेने बदल करता येईल. त्याप्रमाणे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता बाधीत व्यक्तींच्या कुटूंबांना मदत म्हणुन बळीराजा चेतना अभियानांतर्गत ग्राम स्तरीय समित्यांना सुपर्द करण्यात आलेल्या निधीतील अखर्चित निधी परत घेवुन सदर निधीतुन बाधीत व्यक्तींच्या कुटूंबांना प्रती कुटूंब रु.5000/- आर्थीक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुर करुन शासनास सदरचा प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीकरिता पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. व त्याप्रमाणे निधी वितरीत करण्यात आला.

xxxv) उपरोक्तप्रमाणे यवतमाळ जिल्ह्यात कापुस आणि सोयाबीन पिकावर किटकनाशकांची फवारणी करतांना शेतकरी व शेतमजुर यांना झालेल्या विषबाधेबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**<u>विशेष तपास पथकाचे निष्कर्ष</u> - यवतमाळ जिल्हयामध्ये किटकनाशक फवारणीमुळे विषबाधेच्या घटना माहे जुलै महीण्या पासुन घडत होत्या. तथापी या घटनांबाबत जिल्हा प्रशासनास 25.09.2017 ला माहीती मिळाली. त्यानंतर प्रशासनाने तातडीने सर्व विभागाच्या समन्वयाने प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या व त्यामुळे विषबाधेच्या रूग्णांची व मृत्युंची संख्या कमी होण्यास मदत झाली. मात्र 16 मे, 1980 च्या शासन परिपत्रकाप्रमाणे अहवाल पध्दती कार्यान्वित असती तर वेळीच प्रशासनास माहिती मिळुन प्रतिबंधात्मक उपाययोजना करता आल्या असत्या.**

-----*****-----

**<u>मुद्रा क्रमांक - 7 याप्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती भविष्यात होऊ नये याकरीता तातडीने करावयाची कार्यवाहीबाबत शिफारस करणे.</u>**

1) किटकनाशके फवारणी करतांना विषबाधा होऊ नये याबाबत शेतकरी/शेतमजुर यांना घ्यावयाच्या काळजीबाबत जनजागृती, व्यापक प्रचार प्रसिध्दी कृषि विभागाने करावी. कृषि विभागाने हा कार्यक्रम प्रभावी होण्याच्या दृष्टीने सर्व संबधीत विभागांचा सहभाग घ्यावा. माहिती शिक्षण व संवाद (IEC) राज्यस्तरावर आराखडा तयार करून ग्रामस्तर ते राज्यस्तर पर्यत विस्तृत प्रमाणात राबविण्यात यावा.
2) फवारणी करणा-या शेतकरी/शेतमजुरांना किटकनाशके फवारणी करीता कृषि विभागाने तात्काळ संरक्षण किट (PPE- Personal Protective Equipment Kit ) विकसित करून कृषि सेवा केंद्रामार्फत उपलब्ध करून दयावी.
3) परवाना प्राधिकारी यांनी किटकनाशक परवान्यातील उगमपत्रामध्ये केवळ कंपनीचे नाव न लिहता त्या कंपनिच्या पिकनिहाय शिफारस असलेल्या किटकनाशकाची नावे परवान्यामध्ये नमुद करावी. जेणेकरून त्या विभागातील पिकास शिफारशीस नसलेली किटकनाशकाची विक्रीवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य होईल.
4) विषबाधा झाल्यानंतर आवश्यक असणारी Cholinestrase Test सुविधा उपजिल्हा रूग्णालय व जिल्हा रूग्णालय येथे उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच आवश्यक प्रतिविष (Antidote) तात्काळ उपजिल्हा रूग्णालय व जिल्हा रूग्णालय येथे किटकनाशके नियम 1971 कलम 41 अन्वये किटकनाशके उत्पादकाने उपलब्ध करून देण्यात यावे.
5) सद्या स्थितित किटकनाशक कायदा, 1968 अंतर्गत किटकनाशक नियम, 1971 चे कलम 37 अन्वये शेतकरी/शेतमजुर, संस्था मध्ये फवारणीचे काम करणा-या मजुर किवा कामगार यांची नोंदणी व वैद्यकीय तपासणी करण्याची पध्द्त अस्तितवात आहे. अशीच पध्द्त शेतात फवारणीचे काम करणारे शेतकरी/शेतमजुर यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरोग्य विषयक तपासणी करून ग्रामपंचायत स्तरावर प्रत्येक गावात कृषि सहाय्यकामार्फत नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. असे नोंदणीकृत शेतकरी/शेतमजुर हे फवारणी करण्याकरीता आरोग्य दृष्ट्या पात्र आहे किंवा नाही याची वैद्यकीय तपासणी नजिकच्या ग्रामिण रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, जिल्हा रूग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय तपासणी विहीत प्रपत्रात करून स्वास्थ प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. असे प्रमाणपत्र त्यांनी वर्षातुन दोन वेळा प्राप्त करावे. हे प्रमाणपत्र बघुनच शेतक-यांनी शेतमजुरामार्फत फवारणी संरक्षीत किट पुरवून फवारणीचे काम करावे. या प्रमाणपत्राची एक प्रत आरोग्य केंद्र, संबधीत शेतकरी/शेतमजुर, कृषि सहाय्यक व ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध करून दयावी. त्यानुसार कृषि सहाय्यक/तलाठी/ग्रामसेवक यांनी वेळोवेळी सदर प्रमाणपत्राची ग्रामस्तरीय समितीमध्ये तपासणी करून खात्री करावी.

   तपासणीमध्ये शारीरिक स्वास्थ प्रमाणपत्र प्राप्त नसलेले किंवा फवारणीस आरोग्य दृष्टया सक्षम नसलेले शेतकरी/शेतमजुर फवारणी करत असेल तर अशा व्यक्ती विरुद्ध

भा. द. वि. कलम 309 आत्महत्येचा प्रयत्न (I.P.C. Section 309 Attempt to Suicide) नुसार ग्रामसेवक/तलाठी/कृषि सहाय्यक व्दारे गुन्हा दाखल करावा. तसेच आरोग्य प्रमाणपत्र नसलेले, आरोग्य दृष्या फवारणीस सक्षम नाही किंवा फवारणी किट शिवाय फवारणी करत आहे अशा शेतमजुरांना फवारणीचे काम दिले अशा व्यक्ती विरूध्द भा. द. वि. कलम 304 सदोष मनुष्य वध (I.P.C. Section 304 Culpable Homicide) अन्वये ग्रामसेवक/तलाठी/कृषि सहाय्यक व्दारे गुन्हा दाखल करावा व याबाबतचा अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कडे विहीत नमुन्यात सादर करावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सदरचा अहवाल जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासनाकडे देवून कार्यवाही करावी. अहवाल सादर करण्याचे विहीत प्रपत्र कृषि विभागाने तयार करावे.

6) यवतमाळ जिल्हयात कापूस हे पिक वर्षानुवर्ष एकाच जमिनीवर तसेच फरदड (Extended Cotton Crop) मोठया प्रमाणात घेतल्या जाते. त्यामुळे गुलाबी बोंड अळींचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात आढळुन येतो. यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन कापसाच्या जिनिंग प्रेसिंग कारखान्यात गुलाबी बोंड अळींच्या पुढील पिढींच्या प्रजननावरील नियंत्रणासाठी कामगंध सापळे (Pheromone Trap) लावण्याबाबत राज्य शासनाने धोरणात्मक कार्यवाही करावी.
7) वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग व कृषि विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी. कृषि विभागातील गुणनियंत्रण निरीक्षकांची पदे प्राधान्याने भरण्यात यावी.
8) यवतमाळ जिल्हयामध्ये कापूस पिकाचे बीजी-2 प्रकारचे 17,93,135 इतकी पाकीटे लागवड करण्यात आले. त्यामध्ये सर्व वाणामध्ये मागील वर्षी पेक्षा सन 2017 च्या खरीप हंगामामध्ये रस शोषन करणा-या किडी व बोंड अळी (गुलाबी) यांचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळुन आल्याने फवारणीच्या संख्येमध्ये वाढ दिसुन आली. सन 2006 मध्ये बीजी-2, दोन जनुकीय असलेले (Cry 1 Ac + Cry 2 Ab) बीटी बियाणे लागवडीकरीता मंजुर करण्यात आले. सन 2014 नंतर गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव सर्व प्रकारच्या बीजी-2 वाणावर सर्वत्र आढळल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. संशोधनात गुलाबी बोंड अळीची प्रतीकार शक्ती वाढल्यामुळे बीजी-2 वाण प्रभावी नसल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे बीजी-2 संकरीत वाणावर सुध्दा किटकनाशक फवारणीचे प्रमाण वाढले. एकाक्त्मिक कीड व्यवस्थापनाद्वारे गुलाबी बोंड अळीचे प्रभावी नियंत्रणाकरिता सामूहिकरीत्या प्रयत्न करावे. तसेच नविन तंत्रज्ञान वापरून अद्यावत संशोधनातुन कापसाचे नवीन वाण शेतक-यांना उपलब्ध करून दयावे.
9) रासायनिक की डनाशकांचा वापर कमी करण्याच्या उद्देशाने जैविक कि डनाशकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करून प्रचार व प्रसार करण्यात यावा.

-----*********-----

# <u>विशेष तपासणी पथकाने केलेल्या तपासणी अहवालामधिल जोडपत्र</u>

| अ. क्र. | विषय | जोडपत्र क्रमांक | पान क्रमांक | |
|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत |
| **1** | कृषि विभागाच्या विविध योजने अंतर्गत घेण्यात आलेले शेतक-यांचे प्रशिक्षण | 1 | 39 | 39 |
| 2 | अमरावती विभागातील उपलब्ध आरोग्य सुविधा | 2 | 40 | 40 |
| 3 | अमरावती विभागात विविध स्तरावर रूग्ण् भरती आणि मृत्त्यु झालेल्या रुग्णांचा संख्यात्मक अहवाल. | 3 | 41 | 41 |
| 4 | विषबाधा झालेल्या रुग्णाच्या संख्येचा अहवाल पुढील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे. | 4 | 42 | 42 |
| 5 | विभागात विषबाधेमुळे मृत्यु झालेल्या शेतक-यांची संख्यात्मक माहिती | 5 | 43 | 43 |
| 6 | यवतमाळ जिल्हयातील फौजदारी गुन्हे दाखल केलेल्या कृषि केंद्राची माहिती. | 9 | 44 | 45 |
| 7 | यवतमाळ जिल्हयातील किटकनाशक परवाना निलंबीत केलेल्या कृषि केंद्राची माहिती. | 7 | 46 | 47 |
| 8 | अकोला येथील किटकनाशके साठवणुक केंद्र तपासणी दरम्यान दोषी आढळलेल्या किटकनाशके कंपन्यांवर केलेली कार्यवाही. | 8 | 48 | 49 |
| 9 | अमरावती विभागात यवतमाळ जिल्हयासह किटकनाशकाचे सन 2013 ते 2017 तसेच सन 2017 - 18 मध्ये काढलेले नमुने बाबत माहिती. | 9 | 50 | 50 |
| 10 | सन 2015 - 16 ते ऑक्टोबर, 2017 अखेर पर्यत दाखल केलेल्या किटकनाशक पोलीस केसची माहिती. | 10 | 51 | 52 |
| 11 | यवतमाळ जिल्हयातील मृत रूग्णापैकी खालील रूग्णालयामध्ये एकुण 18 मृत रूग्णाचे शवविच्छेदन करण्यात आले. | 11 | 53 | 53 |
| 12 | यवतमाळ किटकनाशकाची फवारणी करतांना विषबाधा झाल्यामुळे मृत पावलेल्या शेतक-यांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन प्रत्येकी रू. 2 लाख मदत वाटपाची माहीती (यवतमाळ जिल्हा). | 12 | 54 | 55 |

**कृषि विभागाच्या विविध योजने अंतर्गत घेण्यात आलेले प्रशिक्षण अहवाल (जोडपत्र क्र 1)**

| अ.क्र. | योजना | प्रशिक्षण संख्या | तालुका संख्या | विवरण |
|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा मासिक चर्चा संत्र | 5 | 5 | कृषि विभागा चे अधिकारी व कृषि विद्यापिठाचे शास्त्रज्ञाचे मार्फत प्रक्षेत्र भेटी , चर्चा व मार्गदर्शन |
| 2 | राष्ट्रीय विकास गळीत धान्य कार्यक्रम सन 2017 - 18 | 25 | 14 | उपस्थित 750 शेतक-यांना सोयाबीन पिक व्यवस्थापन मार्गदर्शन तसेच शेतक -यांच्या पश्नाचे उत्तरे दिली. |
| 3 | राष्ट्रीय अन्न सूरक्षा अभियान सन 2017 - 18 | 40 | 16 | उपस्थित 1200 शेतक-यांना तुर, मुंग, उडिद पिकाच्या एकात्मीक किड व्यवस्थापन बाबत मार्गदर्शन व समस्येचे निराकरण |
| 4 | किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प सन 2017 - 18 | 1<br><br><br>7 | 16<br><br><br>7 | उपस्थित 162 शेतक-यांना जिल्हास्तरावर शेतकरी/कर्मचारी कार्यशाळा घेण्यात येऊ न खरीप हंगामातील प्रमुख पिकांच्या किड व रोग व्यवस्थापन , किटकनाशकाचा वापर व फवारणी सदर्भात घेण्याची काळजी बाबत मार्गदर्शन करण्यात आले. |
| 5 | उन्न्त शेती संमृध्द शेतकरी पंधरवाडा | | 16 (1707 गावे) | सदर प्रशिक्षणामध्ये माती परिक्षण , बिज प्रकिया, कापूस नॉन बी टी रेफुजी बियाण्याची लागवड, आंतर पिक पंध्दतीचा वापर , शेंदरी बोंड अळी नियंत्रण , कपाशी फरदड घेणे टाळणे इत्यादी बाबत मार्गदर्श्न केले. |

## अमरावती विभागातील उपलब्ध आरोग्य सुविधा (जोडपत्र क्र 2)

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अकोला | यवतमाळ | अमरावती | वाशिम | बुलडाणा | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय महाविद्यालय (शासकीय) | 01 | 01 | 00 | 00 | 00 | 02 |
| 2 | प्रादेशिक संदर्भ सेवा केंद्र | 00 | 00 | 01 | 00 | 00 | 01 |
| 3 | जिल्हा रुग्णालय | 00 | 00 | 01 | 01 | 01 | 03 |
| 4 | जिल्हा स्त्रि रुग्णालय | 01 | 00 | 01 | 00 | 00 | 02 |
| 5 | उपजिल्हा रुग्णालय | | | | | | |
| | अ) 200 खाटांचे | 00 | 00 | 00 | 00 | 01 | 01 |
| | ब) 100 खाटांचे | 01 | 00 | 01 | 00 | 01 | 03 |
| | क) 50 खाटांचे | 00 | 03 | 03 | 00 | 01 | 07 |
| 6 | ग्रामीण रुग्णालये | 05 | 14 | 09 | 07 | 12 | 47 |
| 7 | प्राथमिक आरोग्य केंद्र | 30 | 63 | 56 | 25 | 52 | 226 |

**अमरावती विभागात विविध स्तरावर भरती आणि मृत्त्यु झालेल्या रुग्णांचा संख्यात्मक अहवाल**

**(जोडपत्र क्र 3)**

| अ.क्र. | जिल्हा | वर्ष | भरती झालेले रुग्ण आणि मृत्यु (जानेवारी ते ऑक्टोबर) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | किटक नाशक प्राशनामुळे | | किटकनाशक फवारणीमुळे | |
| | | | भरती | मृत्यु | भरती | मृत्यु |
| 1 | यवतमाळ (उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामिण रुग्णालय) | 2016 | 875 | 10 | 226 | 0 |
| | | 2017 | 1072 | 9 | 638 | 2 |
| 2 | यवतमाळ (वैद्यकीय महाविद्यालय) | 2016 | 1425 | 84 | 176 | 6 |
| | | 2017 | 1219 | 108 | 437 | 13 |
| 3 | अकोला (उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामिण रुग्णालय) | 2016 | 209 | 2 | 60 | 0 |
| | | 2017 | 275 | 0 | 64 | 0 |
| 4 | अकोला (वैद्यकीय महाविद्यालय) | 2016 | 599 | 78 | 140 | 6 |
| | | 2017 | 747 | 115 | 211 | 10 |
| 5 | अमरावती (जिल्हा/उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामिण रुग्णालय) | 2016 | 1781 | 119 | 85 | 0 |
| | | 2017 | 1915 | 98 | 196 | 2 |
| 6 | बुलढाणा (जिल्हा/उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामिण रुग्णालय) | 2016 | 909 | 46 | 76 | 0 |
| | | 2017 | 995 | 12 | 161 | 0 |
| 7 | वाशिम (जिल्हा/उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामिण रुग्णालय) | 2016 | 146 | 01 | 1 | 0 |
| | | 2017 | 141 | 01 | 17 | 0 |
| 8 | यवतमाळ जिल्हयातील शासकीय महाविद्यालय व रूग्णालय व्यतीरीक्त इतर ठिकाणी झालेले मृत्यु | 2017 | -- | -- | -- | 6 |

**विभागात विषबाधा झालेल्या रुग्णाच्या संखेचा अहवाल पुढील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे**

**(जोडपत्र क्र 4)**

| अ.क्र. | जिल्हा | वर्ष | भरती झालेले रुग्ण (जानेवारी ते ऑक्टोबर) | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्राशनामुळे | फवारणीमुळे | एकुण | |
| 1 | यवतमाळ | 2016 | 875 | 226 | 1101 | |
| | | 2017 | 1072 | 638 | 1710 | |
| 2 | अकोला | 2016 | 209 | 60 | 269 | |
| | | 2017 | 275 | 64 | 339 | |
| 3 | अमरावती | 2016 | 1781 | 85 | 1866 | |
| | | 2017 | 1915 | 196 | 2111 | |
| 4 | बुलडाणा | 2016 | 909 | 76 | 985 | |
| | | 2017 | 995 | 161 | 1156 | |
| 5 | वाशिम | 2016 | 146 | 1 | 147 | |
| | | 2017 | 141 | 17 | 158 | |
| 6 | वैद्यकीय महाविद्यालय यवतमाळ | 2016 | 1425 | 176 | 1601 | |
| | | 2017 | 1219 | 437 | 1656 | |
| 7 | वैद्यकीय महाविद्यालय अकोला | 2016 | 599 | 140 | 739 | |
| | | 2017 | 747 | 211 | 958 | |

**विभागात किटकनाशके विषबाधेमुळे मृत्यु झालेल्या शेतक-यांची संख्यात्मक माहिती (जोडपत्र क्र 5)**

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **विषबाधेमुळे** | |
|---|---|---|---|
| | | **भरती रूग्ण** | **मृत्यु झालेले रूग्ण** |
| 1 | बुलडाणा | 161 | 0 |
| 2 | अकोला | 275 | 10 |
| 3 | वाशिम | 17 | 0 |
| 4 | अमरावती | 196 | 2 |
| 5 | यवतमाळ | 1075 | 21 |
| एकुण विभाग | | 1724 | 33 |

## यवतमाळ जिल्हयातील गुन्हे दाखल केलेल्या कृषि केंद्राची माहिती (जोडपत्र क्र 6)

| अ. क्र. | तपासणी दिनांक | कृषि केंद्राचे नांव | गांव | तालुका | परवाना क्रमांक | प्रोप्रा चे नांव | आढळलेल्या तृटी | पोलिस स्टेशनचे नांव | निरिक्षकांनी केलेली कार्यवाही | कृविअ कार्यालयाने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5.10.2017 | कृषि वैभव, यवतमाळ | यवतमाळ | यवतमाळ | LAID25010070 | दिलीप धोंडोपंत चिंतावार | अहवाल वेळेवर सादर न करणे<br>परवान्यात समाविष्ट नसलेले किटकनाशके विक्री करणे<br>साठा नोंदवही अद्यावत नसणे<br>विना उगम प्रमाणपत्र किटकनाशक विक्री करणे | वडगांव रोड, यवतमाळ | FIR क्र.1096 दाखल दिनांक 07.10.2017 पोलीस तपास सुरू | परवाना रद्द आदेश क्रमांक 1050 दिनांक 6/10/2017 |
| 2 | 5.10.2017 | कृषि प्रगती, यवतमाळ | यवतमाळ | यवतमाळ | LAID25010111 | दिलीप भाऊराव बोगावार | अहवाल वेळेवर सादर न करणे<br>परवान्यात समाविष्ट नसलेले किटकनाशके विक्री करणे<br>साठा नोंदवही अद्यावत नसणे<br>विना उगम प्रमाणपत्र किटकनाशके विक्री करणे | वडगांव रोड, यवतमाळ | FIR क्र.1097 दाखल दिनांक 07.10.2017 पोलीस तपास सुरू | परवाना रद्द आदेश क्रमांक 1749 दिनांक 6/10/2017 |
| 3 | 5.10.2017 | जलाराम कृषि केंद्र यवतमाळ | सावरगांव | कळंब | LAID25030003 | संजय क. राजा | अहवाल वेळेवर सादर न करणे<br>परवान्यात समाविष्ट नसलेले किटकनाशके विक्री करणे<br>साठा नोंदवही अद्यावत नसणे<br>विना उगम प्रमाणपत्र किटकनाशक विक्री करणे | कळंब | FIR क्र.412 दाखल दिनांक 07.10.2017 पोलीस तपास सुरू | सुनावणी झाली दिनांक 15/11/2017 |
| 4 | 4.10.2017 | अंकीता ॲग्रो एजन्सी, दारव्हा | दारव्हा | दारव्हा | LAID25040003 | प्रितम सुरेशचंद राठी | अहवाल वेळेवर सादर न करणे<br>परवान्यात समाविष्ट नसलेले किटकनाशके विक्री करणे<br>साठा नोंदवही अद्यावत नसणे<br>विना उगम प्रमाणपत्र किटकनाशक विक्री करणे | लाडखेड ता. दारव्हा | FIR क्र.228 दाखल दिनांक 07.10.2017 पोलीस तपास सुरू | सुनावणी दिनांक 20/11/2017 रोजी ठेवलेली आहे. |
| 5 | 4.10.2017 | भेलांडे ॲग्रो एजन्सी, दारव्हा | दारव्हा | दारव्हा | LAID2540001 | प्रविण प्रभाकर भेलोंडे | अहवाल वेळेवर सादर न करणे<br>परवान्यात समाविष्ट नसलेले किटकनाशके विक्री करणे<br>साठा नोंदवही अद्यावत नसणे<br>विना उगम प्रमाणपत्र किटकनाशक विक्री करणे | दारव्हा | FIR क्र.270 दाखल दिनांक 07.10.2017 पोलीस तपास सुरू | सुनावणी दिनांक 20/11/2017 रोजी ठेवलेली आहे. |
| 6 | 7.10.2017 | शेतकरी कृषि केंद्र, कलगांव | दिग्रस | दिग्रस | परवाना नाही | जमालोद्दीन फियामोद्दीन शेख | विना परवाना किटकनाशक विक्री करणे | दारव्हा | FIR क्र.270 दाखल दिनांक 07.10.2017 पोलीस तपास सुरू | --- |

| अ. क्र. | तपासणी दिनांक | कृषि केंद्राचे नांव | गांव | तालुका | परवाना क्रमांक | प्रोप्रा चे नांव | आढळलेल्या तृटी | पोलिस स्टेशनचे नांव | निरिक्षकांनी केलेली कार्यवाही | कृविअ कार्यालयाने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 7.10.2017 | कृषिवैभव, पांढरकवडा | पांढरकवडा | पांढरकवडा | LIAD25140023 | दिपक भाष्करराव कापत्रीवार | विना उगम प्रमाणपत्र किटकनाशक विक्री करणे | पांढरकवडा | FIR क्र.762 दाखल दिनांक 08.10.2017 पोलीस तपास सुरू | सुनावणी दिनांक 20/11/2017 रोजी ठेवलेली आहे. |
| 8 | 8.10.2017 | आनंद कृषि केंद्र, मुकूटबन | मुकूटबन | झरी | LIAD25130028 | सुरेंद्र गणपत तातेड | अहवाल वेळेवर सादर न करणे<br>परवान्यात समाविष्ट नसलेले किटकनाशके विक्री करणे<br>साठा नोंदवही अद्यावत नसणे<br>विना उगम प्रमाणपत्र किटकनाशक विक्री करणे | मुकूटबन | FIR क्र.0203 दाखल दिनांक 08.10.2017 पोलीस तपास सुरू | सुनावणी दिनांक 20/11/2017 रोजी ठेवलेली आहे. |
| | | युनायटेड फॉस्फरस लिमिटेड | वापी | झरी | -- | मॅनेजर युपीएल वापी गुजरात | अहवाल वेळेवर सादर न करणे<br>परवान्यात समाविष्ट नसलेले किटकनाशके विक्री करणे<br>विना principal Certificate किटकनाशक विक्री करणे | | | |
| 9. | 11.10.2017 | जय दुर्गा कृषि केंद्र वळकी | वडकी | राळेगांव | -- | उमेश दामोदर गौळकर | विना परवाना किटकनाशक विक्री करणे | वडकी | FIR क्र.0207 दाखल दिनांक 12.10.2017 पोलीस तपास सुरू | -- |
| 10 | 14.10.2017 | चिंतामणी कृषि केंद्र कळंब. | कळंब | यवतमाळ | LIAD25030040 | उदय प्रभाकर येरावार | परवान्यात समाविष्ट नसलेले किटकनाशके विक्री करणे<br>किटकनाशक साठा भावफलक सहज दिसेल अशा दर्शनी भागात न लावणे<br>साठा नोंदवही अद्यावत नसणे<br>बिल विहीत नमुन्यात परिपुर्ण भरून न देणे<br>मासिक अहवाल सादर न करणे | कळंब | FIR क्र.445 दाखल दिनांक 28.10.2017 पोलीस तपास सुरू | सुनावणी झाली दिनांक 15/11/2017 |

**अकोला येथील किटकनाशके साठवणुक केंद्र तपासणी दरम्यान दोषी आढळलेल्या किटकनाशके कंपन्यांवर केलेली कार्यवाही (जोडपत्र क्र 8)**

| अ. क्र. | कंपनीचे नाव व परवाना क्रमांक | तपासणीमध्ये आढळुन लालेल्या त्रृटी | संचालक (नि व गुनि), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी केलेली किार्यवाही |
|---|---|---|---|
| 1 | मे भारत इंन्सेक्टीसाईडस् लि. LAID10010096 | Fenoxzprop - P - Ethyl 9.3% EC<br>बिना परवाना विक्री करणे. | आदेश क्रमांक 2138/दि. 28.10.17 अन्वये किटकनाशक कायदा, 1968 कलम 13 (1) व किटकनाशक नियम 1971 नियम 10 (1) चे उल्लंघन केल्यामुळे **परवाना रद्द** करण्यात आलेला आहे. जप्त साठा मुल्य रू. 11,68,600/- |
| 2 | मे पारीजात इंडस्ट्रिज (इंडिया) प्रा. ली. LAID10010230 | Pyriprofen 10% + Bifenthrin 10% EC<br>बिना परवाना विक्री करणे. | आदेश क्रमांक 2264/दि. 18.11.17 अन्वये किटकनाशक कायदा, 1968 कलम 13 (1) व किटकनाशक नियम 1971 नियम 10 (1) चे उल्लंघन केल्यामुळे **सक्त ताकीद** देण्यात आलेली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. |
| 3 | मे कृषि रसायन एक्सपर्ट प्रा. ली. LAID10010026 | Azoxystrobin 11% + Tebuconazole 18.30 SC व Thiamethoxam 25%WG<br>बिना परवाना विक्री करणे. | आदेश क्रमांक 2265/दि. 18.11.17 अन्वये किटकनाशक कायदा, 1968 कलम 13 (1) व किटकनाशक नियम 1971 नियम 10 (1) चे उल्लंघन केल्यामुळे **परवाना रद्द** करण्यात आलेला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. जप्त साठा मुल्य् रू. 14,97,000/- लाख |
| 4 | मे बायोस्टॅड इंडिया प्रा. ली. LAID10010270 | Hexaconazol 4% + Zineb 68 WP<br>बिना परवाना विक्री करणे. | आदेश क्रमांक 2268/दि. 18.11.17 अन्वये किटकनाशक कायदा, 1968 कलम 13 (1) व किटकनाशक नियम 1971 नियम 10 (1) चे उल्लंघन केल्यामुळे **परवाना रद्द** करण्यात आलेला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. जप्त साठा मुल्य रू. 7,34,000/- लाख. |
| 5 | मे केमीनोव्हा इंडिया प्रा. ली. LAID10010042 | Quuizalofop ethyl 5% EC, Quinolphos 25% EC, Trizophos 40% EC, Metasulfauron methyl 20% WG, Capton 70% + Hexaconazol 5%EC<br>बिना परवाना विक्री करणे. | आदेश क्रमांक 2266/दि. 18.11.17 अन्वये किटकनाशक कायदा, 1968 कलम 13 (1) व किटकनाशक नियम 1971 नियम 10 (1) चे उल्लंघन केल्यामुळे **परवाना रद्द** करण्यात आलेला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. जप्त साठा मुल्य रू. 164.93 लाख. |
| 6 | मे एफएमसी इंडिया प्रा. ली. LAID10010133 | Hexaconazol 5% + Zineb 68 WP<br>बिना परवाना विक्री करणे. | आदेश क्रमांक 2267/दि. 18.11.17 अन्वये किटकनाशक कायदा, 1968 कलम 13 (1) व किटकनाशक नियम 1971 नियम 10 (1) चे उल्लंघन केल्यामुळे **परवाना रद्द** करण्यात आलेला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. जप्त साठा मुल्य रू. 10.28 लाख. |

| अ. क्र. | कंपनीचे नाव व परवाना क्रमांक | तपासणीमध्ये आढळुन लालेल्या त्रृटी | संचालक (नि व गुनि), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी केलेली किार्यवाही |
|---|---|---|---|
| 7 | मे रेन्बो क्रॉप हेल्थ् ली.<br>LAID10010433 | Gibberillic Acid 0.001% L, Pretilachlor 50% EC, Tricontanol 0.1% EW<br>बिना परवाना विक्री करणे. | आदेश क्रमांक 2154/दि. 30.10.17 अन्वये किटकनाशक कायदा, 1968 कलम 13 (1) व किटकनाशक नियम 1971 नियम 10 (1) चे उल्लंघन केल्यामुळे **परवाना रद्द** करण्यात आलेला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. जप्त साठा मुल्य रू. 14.96 लाख. |

**अमरावती विभागात यवतमाळ जिल्हयासह किटकनाशकाचे सन 2013 ते 2017 तसेच सन 2017 - 18 मध्ये काढलेले नमुने अप्रमाणित नमुने, दाखल कोर्टकेसेस, प्रशासकीय कारणास्तव निकाली, निरिक्षक स्तरावरील प्रलंबीत कोर्टकेसेस इत्यादी माहिती खालीलप्रमाणे आहे. (जोडपत्र क्र 9)**

| जिल्हा | वर्ष | काढलेले नमुने (संख्या) | अप्रमाणित नमुने (संख्या) | दाखल कोर्टकेसेस (संख्या) | पुनर्रतपासणी मध्ये पास नमुने (संख्या) | प्रशासकीय करणास्त्व निकाली (संख्या) | निकाल लागलेल्या कोर्टकेसची (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बुलडाणा | सन 2013 ते 2017 | 782 | 31 | 20 | 3 | 7 | निरंक |
| अकोला | | 1308 | 56 | 35 | 21 | 0 | निरंक |
| वाशिम | | 475 | 28 | 20 | 7 | 1 | निरंक |
| अमरावती | | 1342 | 91 | 58 | 21 | 9 | निरंक |
| यवतमाळ | | 799 | 34 | 21 | 8 | 1 | निरंक |
| एकुण विभाग | | 4706 | 240 | 154 | 60 | 18 | निरंक |

| जिल्हा | वर्ष | काढलेले नमुने (संख्या) | अप्रमाणित नमुने (संख्या) | दाखल कोर्ट केसेस (संख्या) | पुनर्रतपासणी मध्ये पास नमुने (संख्या) | निरिक्षक स्तरावर प्रलंबीत (संख्या) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बुलडाणा | दि. 01.04.17 ते 31.10.17 पर्यत | 174 | 2 | 0 | 0 | 2 | संबंधीत कंपन्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून कायदयानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. |
| अकोला | | 222 | 1 | 0 | 0 | 1 | |
| वाशिम | | 101 | 0 | 0 | 0 | 0 | |
| अमरावती | | 238 | 2 | 0 | 0 | 2 | |
| यवतमाळ | | 205 | 8 | 0 | 0 | 8 | |
| एकुण विभाग | | 940 | 13 | 0 | 0 | 13 | |

**सन 2015 - 16 ते ऑक्टोबर, 2017 अखेर पर्यत दाखल केलेल्या किटकनाशक पोलीस केसची माहिती.** (जोडपत्र क्र 10)

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **कालावधी** | **पोलीस केस दाखल करणा-या निरिक्षकाचे पदनाम** | **आरोपीचे नाव व पत्ता** | **पोलीस स्टेशनचे नाव व पत्ता** | **पोलीस केस क्रमांक व दिनांक** | **पोलीस केस दाखल करण्याची कारणे व उल्लंघन केलेली कलमे** | **झालेली कार्यवाही** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वाशिम | सन 205-16 | कृषि अधिकारी, पंचायत समिती, मानोरा | प्रफुल जयप्रकाश बाहेती, प्रो प्रा बाहेती ऍग्रो एजन्सी, मानोरा, ता. मानोरा, जि. वाशिम | पोलीस स्टेशन, मानोरा | 28/16 दि. 13.02.16 | किटकनाशक नियम, 1968 कलम 29 (3) उल्लंघन | किटकनाशक परवाना एक महिण्याकरीता निलंबीत |
| 2 | अमरावती | | कृषि अधिकारी, पंचायत समिती, दर्यापूर | राजु मारोती वानखडे, वार्ड नं. 5, सौनिक कॉलनी, दर्यापूर | पोलीस स्टेशन, दर्यापूर | 129/15 दि. 28.05.15 | अनधिकृत जागेत कोणताही किटकनाशकाचा परवाना नसतांना बनावट किटकनाशकाचा साठा केल्याने. किटकनाशक कायदा, 1968 चे कलम 9, 13 व किटकनाशक नियम, 1971 चे नियम 6, 9, 10, 10(4),15 व 18 | बनावट किटकनाशकाचा 127 लि. साठा जप्त |
| **3** | | | जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती | श्री निखिल श्रीकांत सोनी, प्रो. प्रा. मे अरूणा केमीलकल्स्, एम आय डी सी, अमरावती | पोलीस स्टेशन, राजापेठ, जि. अमरावती | 3117/15/15 दि. 21.08.15 | अवैधरित्या विक्री करण्यात येत असलेले किटकनाशक (Emamectin Benzoate) या किटकनाशकाची लेबल नसलेली प्लास्टीक पिशवित खुली विक्री करणे. | 225 कि. ग्रॅ. साठा जप्त करण्यात आला. |

| अ.क्र. | जिल्हा | कालावधी | पोलीस केस दाखल करणा-या निरिक्षकाचे पदनाम | आरोपीचे नाव व पत्ता | पोलीस स्टेशनचे नाव व पत्ता | पोलीस केस क्रमांक व दिनांक | पोलीस केस दाखल करण्याची कारणे व उल्लंघन केलेली कलमे | झालेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | किटकनाशक कायदा, 1968 चे कलम 9, 13 व किटकनाशक नियम, 1971 चे नियम 6, 9, 10, 10(4),15 व 18 किटकनाशक आदेश, 1986 चे खंड 4 व 5 चे उल्लंघन | |
| **4** | वाशिम | सन 2016-17 | मोहिम अधिकारी, जि. प. वाशिम | दामोदर वसंता इंगोले, रा. वसारी, ता. मालेगांव | पोलीस स्टेशन, शिरपूर, ता. मालेगांव | 0127 दि. 26.08.16 | बिना परवाना किटकशकाची विक्री करणे. किटकनाशक कायदा, 1968 चे कलम 9, 13 व किटकनाशक नियम, 1971 चे नियम 6, 9, 10, 10(4),15 व 18 | |
| **5** | **अकोला** | सन 2017-18 | एम. डी. जंजाळ, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक, अकोला | मे ढोमणे कृषि सेवा केंद्र, बोरगांव मंजु, ता. जि. अकोला, मे ग्रोटेक ॲग्री सायन्स् ॲण्ड् रिसर्च प्रा. ली. इंदौर | पोलीस स्टेशन, बोरगांव मंजु, ता. जि. अकोला | 333/17 दि. 28.09.17 | किटकनाशकास महाराष्ट्रात विक्री करण्याची परवानगी नसल्याने. किटकनाशक कायदा, 1968 चे 10 (4) (7), 15 चे उल्लंघन केल्याने. | |

**एकुण 21 मृत रूग्णापैकी खालील रूग्णालयामध्ये एकुण 18 मृत रूग्णाचे शवविच्छेदन करण्यात आले. (जोडपत्र क्र. 11)**

| **अ. क्र.** | **रूग्णालयाचे नाव** | **मृत पावलेल्या रूग्णांची संख्या** |
|---|---|---|
| 1 | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, यवतमाळ | 12 |
| 2 | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर | 1 |
| 3 | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, वर्धा | 1 |
| 4 | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, चंद्रपूर | 1 |
| 5 | मृत्यु खाजगी रूग्णालय | 2 |
| 6 | ग्रामिण रूग्णालय, मारेगांव, जि. यवतमाळ | 1 |
| 7 | शवविच्छेदन करण्यात आले नाही | 3 |

**किटकनाशकाची फवारणी करतांना विषबाधा झाल्यामुळे मृत पावलेल्या शेतक-यांना मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन प्रत्येकी रू. 2 लाख मदत वाटपाची माहीती (यवतमाळ जिल्हा). (जोडपत्र क्र. 12)**

| अ. क्र. | विषबाधा हाऊन मृत पावलेल्या शेतक-याचे नांव | शेतकरी/ शेतमजुर | गांव | तालुका | मृत्यु झाल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | देविदास रामाजी मडावी | शेतमजुर | पोळयाचा मारोती | कळंब | 19.08.2017 | मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 2 | कैलास विठ्ठलराव पेंदोर | शेतकरी | निमणी-मुकुटबन | झरी जामणी | 06.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 3 | रमेश येरन्ना चिल्लरवार | शेतमजुर | कुर्ली-पारवा | घाटंजी | 13.09.2017 | मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 4 | वसंत केशव सिडाम | शेतमजुर | मारेगांव | मारेगांव | 08.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 5 | शंकर नागोजी आगलावे | शेतकरी | पिसगांव | मारेगांव | 30.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 6 | शेख अयुब शेख महंमद | शेतमजुर | डेहणी कलगांव | दिग्रस | 04.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 7 | बंडु चंद्रभान सोनुले | शेतमजुर | मानोली | घाटंजी | 23.09.2017 | मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 8 | दशरथ रामा चव्हाण | शेतकरी | नायगांव | दारव्हा | 24.08.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 9 | रवि दुलसिंग राठोड | शेतमजुर | सेवादास नगर | दारव्हा | 26.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 10 | गजानन नामदेव फुलमाळी | शेतकरी | सावरगांव | कळंब | 01.10.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 11 | दिवाकर तुळशीराम घागी | शेतकरी | घोडदरा | मारेगांव | 10.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 12 | शंकर विठ्ठल गेडाम | शेतकरी | टाकळी | मारेगांव | 17.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 13 | विठ्ठल देवन्ना पेरकेवार | शेतकरी | पहापळ | केळापुर | 16.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| 14 | संतोष उत्तम राठोड | शेतकरी | पाळोदी | आर्णी | 29.08.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता |

| अ. क्र. | विषबाधा हाऊन मृत पावलेल्या शेतक-याचे नांव | शेतकरी/ शेतमजुर | गांव | तालुका | मृत्यु झाल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | निधीतुन मदत वाटप |
| **15** | प्रदिप भाऊराव सोयाम | शेतकरी | टेंभी | केळापुर | 28.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| **16** | दिपक शामराव मडावी | शेतकरी | शेंदुरसनी | आर्णी | 31.08.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| **17** | दत्तात्राय गजानन टेकाम | शेतकरी | आमलोण | वणी | 01.10.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| **18** | सुशील धावरा चव्हाण | शेतकरी | उमरी ईजारा | दारव्हा | 07.09.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| **19** | जंगलु महादेव ठावरी | शेतकरी | कृष्णांनपुर | वणी | 05.10.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| **20** | गजानन हनुमंत नैताम | शेतकरी | माथार्जुन | झरी जामणी | 13.10.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |
| **21** | मधुकर पोचीराम बावणे | शेतमजुर | दिग्रस | झरी जामणी | 14.10.2017 | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत वाटप |